छात्र प्रबोधन

सौर पौष, शके १९३४ । वर्ष १३ अंक ४
मूल्य रुपये पंधरा

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी, कृतिशीलता जोपासणारे मासिक !

रेषासंवाद



व्यंगचित्रकार : वैजनाथ दुलंगे

छात्र प्रबोधन

सौर पौष, शके १९३४। वर्ष १३ अंक ४

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै - ऑगस्ट १९९२) २४६ वा अंक, वर्ष २१ अंक ६

प्रकाशन दिनांक - ११ पौष, शके १९३४/१ जानेवारी २०१३

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

• अंतरंग •

२. **संवाद** - महेन्द्र सेठिया

३. प्रेरणादायी... **आधुनिक भारताचे द्रष्टे शिल्पकार स्वामी विवेकानंद !** - स्वामी श्रीकांतानंद

६. कविता... **रे पाखरा** - मुबारक शेख

७. माहितीपर...**'रेझांग ला' ची लढाई** - प्रफुल्ल कुलकर्णी

११. ललित... **कागदी होड्या** - मल्हार अरणकल्ले

१५. कथा ... **फसवणूक** - कविता मेहेंदळे

२०. नाट्यछटा... **जरा ऐकून तर घ्या !!** - एकनाथ आव्हाड

२१. कविता... **नांदवू जगी शांतता** - सचिन बेंडभर

२३. पाहिलेच पाहिजे असे काही... **फादर** - प्रसाद नामजोशी

२५. निर्णयातील स्वावलंबन... **क्रीडा आणि निर्णय कौशल्य** - प्रा. आनंद लुंकड

२८. ललित... **शुभ प्रभात** - मुकुंदराज कुलकर्णी

३०. मुलांचे पान... **माझं जरा चुकलंच** - कु. आसावरी थिटे

वाचलेच पाहिजे असे काही... **नवेगावबांधचे दिवस** - कु. अपूर्वा फडणीस

३२. **माझ्या नजरेतून 'छात्र प्रबोधन'**

याशिवाय - किस्से थोरामोठ्यांचे (६), जरा डोकं चालवा, मलपृष्ठाच्या आतील पानावरील पद्याचा भावार्थ (१४) करून तर पाहा (२१), मुखपृष्ठ चित्रकार (२४), मलपृष्ठ प्रकाशचित्रांविषयी...(२९)

मासिकाची वर्गणी : वार्षिक: ₹ १८०, द्वैवार्षिक: ₹ ३४०, त्रैवार्षिक: ₹ ५००, दशवार्षिक: ₹ १,५००. **या अंकाची किंमत : ₹ १५**

पुण्याबाहेरील धनादेशासाठी - ₹ २० जादा, घरपोच दिवाळी अंकासाठी- प्रतिवर्षी ₹ ४० जादा

मुखपृष्ठाविषयी

या निसर्गचित्रात तैलरंगाचा वापर केल्यामुळे व उष्ण आणि शीत रंग एकमेकांजवळ घेतल्यामुळे, हे चित्र जास्त परिणामकारक झाले आहे. नावेचे प्रतिबिंब तुटक दाखवल्यामुळे पाण्याची हालचाल जाणवत आहे. त्यामुळे चित्राला एक वेगळाच जिवंतपणा आला आहे.

- ओंकार इनामदार

• संपादक, प्रकाशक, मुद्रक •
महेन्द्र सेठिया

• कार्यकारी संपादक •
शिल्पा कुलकर्णी

• संपादक मंडळ •
शैलजा देशमुख, नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे, आश्लेषा महाजन

• मुखपृष्ठ •
ओंकार इनामदार

• आतील चित्रे •
अभय पुरंदरे

• संपर्क पत्ता •
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे - 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९
संकेतस्थळ
www.chhatraprabodhan.org
ई-मेल
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

सर्वांना सस्नेह निमंत्रण !!

ज्ञान प्रबोधिनी कार्य प्रात्यक्षिके

दि. २७ जानेवारी २०१३
वेळ : सायं. ६.३० ते ८.००
स्थळ : न्यु इंग्लिश स्कूल, टिळक रस्ता, पुणे.

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही र कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतील असे नाही.

नवा सूर्य, नवे तारे, नवे गीत, नवे तराणे । जगण्याचं बळ देऊन जातात, जीवन सुगंधी करून जातात !

✲ आदरांजली... भारताची पहिली महिला फोटो पत्रकार होमाई व्यारवाला - १५ जानेवारी २०१२ ✲

संवाद

संवेदनशील अन् प्रतिसादी असणाऱ्या प्रिय प्रबोधकांनो,

अत्यंत अस्वस्थ करणाऱ्या अनेक घटना आपल्या आसपास सध्या घडत आहेत. दिल्लीतील बलात्काराची घटना ही त्यातलीच एक अत्यंत चीड व संताप आणणारी घटना! त्या पाठोपाठ महाराष्ट्रातीलही काही घटना उघडकीस आल्या. स्त्री-भ्रूण हत्या ते स्त्रियांवरील विविध प्रकारचे अत्याचार यांसारख्या घटना विकृत, रोगग्रस्त समाजमनाचं निदर्शक आहेत असंच म्हणावं लागेल. अशा घटना घडल्या, की त्याविरुद्ध आवाज उठविणं, मोर्चा काढणं, निषेध नोंदविणं, चर्चा करणं, प्रसिद्धी माध्यमांमध्ये तावातावानं होणाऱ्या चर्चा वाचणं/ ऐकणं इत्यादी मार्गांनी प्रतिसाद द्यावासा वाटणं आणि तसा तो देणं हे जिवंतपणाचं, संवेदनशील मनाचं लक्षण आहे. 'मला काय त्याचं', 'माझा त्याच्याशी काय संबंध' असे न म्हणता तुम्ही सर्वांनी असं संवेदनशील असायलाच हवं; पण तेवढं पुरेसं नाही. चुकीच्या घटना घडल्यावर 'मग' त्यावर प्रतिक्रिया देणं- प्रतिसाद देणं, याचा अर्थ प्रतिसाद देण्यासाठी अशा घटना घडायला हव्यात का? की अशा घटना घडूच नयेत यासाठी प्रयत्न करायचे? तुम्ही म्हणाल, म्हणजे काय करायचं? तर, अशा घटना का घडतात त्याची कारणं शोधायचा प्रयत्न करायचा, त्यावर उपाय शोधायचा आणि त्याची कार्यवाही स्वत:पासून सुरू करायची. हळूहळू तशी कार्यवाही इतरांनीही करावी यासाठी प्रयत्न करायचे. असं करणं म्हणजे खऱ्या अर्थानं प्रतिसादी होणं.

स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटनांमागे मुख्य कारण पुरुषांच्या/स्त्रियांच्या विकृत मानसिकतेत आहे, असं मला वाटतं. तुम्ही, आजची मुलं-मुली उद्याचे 'पुरुष' आणि 'स्त्रिया' होणार आहात; मग तुमची मानसिकता विकृत व्हायची नसेल तर तुम्ही काय केलं पाहिजे...मुलींची छेडछाड करणं, त्यांना शारीरिक-मानसिक त्रास देणं, हिणवणं, कमी लेखणं (आणि त्यातच मर्दुमकी, आनंद मानणं), त्यांची फसवणूक करणं, त्यांच्या मनाविरुद्ध त्यांच्यावर काही गोष्टी लादणं, हे मुलांनी पूर्णपणे थांबवायला हवं. स्वत: तर अशा गोष्टी करायच्या नाहीतच; पण इतरांनाही त्या करू द्यायच्या नाहीत यासाठी आवश्यक ते बळही तुम्ही मिळवावं. सदाचाराला सामर्थ्याची जोड असायलाच हवी. त्याचबरोबर मुलींच्या मतांचा, भावनांचा योग्य आदर करणं, त्यांच्या कर्तृत्वाला वाव व दाद देणं, त्यांच्या क्षमतांवर विश्वास ठेवणं हेही मुलांनी मनापासून करायला हवं. आणि स्वातंत्र्याचं स्वैराचारात रूपांतर होणार नाही याची काळजी मुलींनीही घ्यायला हवी. आपल्या 'मुलगी' असण्याचा गैरफायदा मुलींनी कधीही घेता कामा नये. उदा. अतिलाडिकपणा, छोट्या-छोट्या गोष्टींवर रडणं, अकांडतांडव करणं, आपल्या देहाचं प्रदर्शन होईल असे कपडे घालणं, लक्ष वेधून घेण्यासाठी सौंदर्यप्रसाधनांचा भडक वापर करणं, भावनांचं सार्वजनिक प्रदर्शन करणं, शारीरिक कष्टाची कामं टाळणं, छोट्या-छोट्या गोष्टींसाठी मुलांवर अवलंबून राहणं, इ. टाळावे. शारीरिक ताकद वाढविण्याबरोबरच स्व-संरक्षणाचं कौशल्यही मुलींनी आवर्जून आत्मसात करायला हवं. मनाचा ठामपणा आणि कणखरपणाही वाढवायला हवा. प्रत्येक गोष्टीत मुलांशी चढाओढ करण्याऐवजी आपल्या अंगभूत व वैशिष्ट्यपूर्ण गुणांना व क्षमतांना परिपूर्ण वाव मिळेल, असं कर्तृत्व मुलींनी गाजवायला हवं.

मला असं वाटतं, आपलं रोजचं वागणं-बोलणं तुम्ही सर्वांनी यासंदर्भात तपासून पाहायला हवं. त्यात जाणीवपूर्वक योग्य ते बदल करायला हवेत आणि तसे बदल तुमच्या मित्र-मैत्रिणींमध्ये-भावंडांमध्ये व्हावेत यासाठी सातत्याने प्रयत्न करायला हवेत. अशा रितीने प्रतिसाद दिलात तर भविष्यामध्ये परिस्थिती नक्कीच बदलेल.

आपल्या देशाच्या त्रेसष्ठाव्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने भाषा, वेशभूषा, स्वाक्षरी, अभिवादन, सण-समारंभ, कला-अभिव्यक्ती, आहार-व्यायाम पद्धती इ. बाबत अधिकाधिक 'स्वदेशी ' होण्याचा प्रयत्न करत करत, आपल्या आसपासच्या घटनांबाबत अधिक संवेदनशील आणि प्रतिसादी होण्याचा संकल्प आपण करूया. 'छात्र प्रबोधन' त्यासाठी तुम्हाला नक्कीच मदत करेल, उपयोगी ठरेल.

संक्रांतीनिमित्त आपल्यातला स्नेहभाव, मैत्रीचं-आपलेपणाचं नातं अधिक दृढ करूया. तुमच्या सर्वांचे मैत्रीचे वर्तुळ वाढते राहो, यासाठी मनापासून शुभेच्छा!

सस्नेह तुमचा,

(महेन्द्र सेठिया)

निर्भयतेच्या कथा आठवूनी, जोम झगडण्या मिळवूया । तेजाचे ते किरण लेवूनी, धीट मनाला बनवूया ।।

✲ **आदरांजली...** ज्येष्ठ मल्याळम लेखक सुकुमार आझिकोडे - २४ जानेवारी २०१२ ✲

प्रायोजक - व्ही. व्ही. आर्किटे ट प्रा. लि., पुणे.

आधुनिक भारताचे द्रष्टे शिल्पकार स्वामी विवेकानंद !

– स्वामी श्रीकांतानंद

वर्ष २०१२–१३ हे स्वामी विवेकानंदांचे शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंती वर्ष ! या आधी आपण एका लेखातून स्वामीजींच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्टये जाणून घेतली .(अंक– सौर चैत्र १९३४, एप्रिल २०१२) तसेच गेल्या वर्षभरात अंकातून स्वामी विवेकानंदांवरच्या गौरवपर गीतांची ओळख आपण करून घेतली. यंदाच्या दिवाळी विशेषांकात स्वामीजींनी केलेली भारत परिक्रमा–त्यातून केलेला अभ्यास, मनन, चिंतन, देशस्थिती जाणून घेणं इत्यादींची ओळख आपण करून घेतली.

आपल्या देशातील युवा पिढीसाठीही त्यांनी खूप मोलाचे विचार मांडले. स्वामी विवेकानंदांचे सर्वच विचार कोणत्याही काळात तितकेच अनुकरणीय आहेत.

त्या विचारांचं स्मरण करून दिलंय स्वामीजींच्या विचारधारेत आपले जीवन व्यतीत करणाऱ्या स्वामी श्रीकांतानंदांनी !

स्वामी विवेकानंदांचे विचारधन म्हणजे निरंतर प्रेरणेचा स्रोत. ११५ वर्षांपूर्वी **'उठा, जागे व्हा, आणि ध्येयप्राप्ती होईपर्यंत थांबू नका'**, अशी सिंहगर्जना करून स्वामी विवेकानंदांनी निद्रिस्त भारताला जागे केले. तत्कालीन तरुणांच्या मनात देशभ तीचे बीजारोपण करून त्यांना स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी प्रेरित केले. त्यांनी युवकांना आवाहन केले, **'पुढील पन्नास वर्षे सर्व देवदेवतांचे पूजन थांबवून केवळ भारतमातेचेच पूजन करा.'** स्वामीजींच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन अनेक युवकांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. यात प्रामख्याने सुभाषचंद्र बोस, योगी अरविंद, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, भगिनी निवेदिता यांचा उल्लेख करता येईल. महात्मा गांधी म्हणाले, ''स्वामी विवेकानंदांचे साहित्य वाचल्यानंतर माझे देशावरील प्रेम एक हजार पटीने वाढले.'' स्वामी विवेकानंद हे राष्ट्रद्रष्ट्रे होते. ते आधुनिक भारताचे शिल्पकार होते. त्यांना भारताच्या भूत, वर्तमान व भविष्य काळाबद्दल जाणीव होती. भारतभ्रमणात त्यांनी देशातील लोकांच्या समस्या जवळून बघितल्या होत्या व त्यावर उपायसुद्धा सुचविले होते. परंतु आपण त्याकडे संपूर्णपणे दुर्लक्ष केले. स्वामी विवेकानंदांचे विचार जर आचरणात आणले गेले असते तर आज भारताचे चित्र पूर्णपणे बदलून गेले असते.

भारताजवळ प्रचंड प्रमाणात नैसर्गिक साधनसंपत्ती, मनुष्यबळ आणि बुद्धिबळ असूनसुद्धा त्याचा अपेक्षेप्रमाणे विकास का होऊ शकला नाही? कारण या सर्वांना जोड हवी होती ती शुद्ध चारित्र्याची. आज वेगवेगळ्या क्षेत्रातील भ्रष्टाचाराच्या बातम्या आपण सतत ऐकत असतो. त्यातून 'चारित्र्याचा असलेला अभाव' हे एक कारण या भ्रष्टाचाराला कारणीभूत आहे असे दिसून येते. म्हणूनच मनुष्यघडणीसाठी आणि पर्यायाने देशाच्या उभारणीसाठी विवेकानंदांचे विचार आजही अनुकरणीय आहेत.

आज सामान्यत: शिक्षण केवळ उपजीविका प्राप्त करण्याचे एक साधन एवढ्यापुरतेच मर्यादित राहिले आहे. वेगवेगळ्या विषयांची माहिति गोळा करून परीक्षा पास

मनगट मनगट दणकट इथले, पोलादी छाती। रूधिरांच्या थेंबाची येथे, ठिणग्यांशी नाती।।

✲ आदरांजली – ज्येष्ठ संगीतकार – अनिल मोहिले – १ फेब्रुवारी २०१२ ✲
प्रायोजक – कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे.

होणे व नोकरी मिळवून यंत्रवत् जीवन जगणे, हेच जणू आपल्या जीवनाचे एकमात्र ध्येय होऊन गेले आहे. त्याचा परिणाम असा झाला आहे की, मनुष्यापेक्षा पैशालाच जास्त महत्त्व प्राप्त झाले आहे. आजच्या **आपल्या सर्व समस्यांचे कारण** म्हणजे, **'देशात नि:स्वार्थ व चारित्र्यवान मनुष्यांचा अभाव'**, हेच होय.

करुणा, प्रेम, सहानुभूती, सेवाभाव, सत्यभाषण, उदारभाव, अहिंसा, प्रामाणिकपणा, निर्भयता, आत्मवि ास, देशभ ती इत्यादी नैतिक व मानवी मूल्ये पायदळी तुडविली जात आहेत. ग्रंथालयातील सर्व पुस्तके वाचून कंठस्थ करण्यापेक्षा थोडेच विचार आत्मसात करून आपण ते आचरणात आणल्यास जीवनाचे सार्थक होऊ शकते. आज स्वामी विवेकानंदांच्या विचारांची जगाला प्रकर्षाने गरज आहे. शिक्षणाविषयी बोलताना स्वामीजी म्हणतात, **'चारित्र्य निर्माण करणारे, मनाची श ती वाढविणारे, बुद्धीचा विकास करणारे व स्वावलंबी बनविणारे शिक्षण आज आम्हास हवे आहे.'** केवळ पदवी प्राप्त करणारे अनेक तरुण आज बेकारीची शिकार बनलेले दिसतात. त्याऐवजी व्यवसाय शिक्षण, सचोटीने करावयाची उद्योजकता याचाही विचार विद्यार्थीदशेतच जाणीवपूर्वक व्हायला हवा.

कोणत्याही क्षेत्रात ज्ञान प्राप्त करून यश संपादन करण्यासाठी मनाच्या एकाग्रतेची आवश्यकता असते. आज विज्ञानाच्या अत्याधुनिक शोधांमुळे समाजाच्या विकासात भर पडली खरी पण त्यासोबतच अनेक धोके सुद्धा निर्माण झाले आहेत. जगातील सर्व प्रलोभने व आकर्षणे अगदी सहज उपलब्ध असल्यामुळे मुलांची अपरिप व मने मोहित होऊन वाईट व्यसनांना ती बळी पडत आहेत. साधं उदाहरण द्यायचं झालं तर बरेचदा शाळा घरापासून दूर असते. आपले आईबाबा नोकरीनिमित्त दिवसभर बाहेर असतात. आपली गैरसोय होऊ नये म्हणून मोठ्या विश्वासाने आपल्याला खर्चासाठी ते पैसे देतात. मित्रांच्या संगतीत त्या पैशांचा दुरुपयोग तर आपण करत नाही ना? चांगलं काय, वाईट काय त्याचा आपला आपण विचार करून चांगलं तेच काम करण्याची, कृती करण्याचा आपल्या मनाचा निर्धार हवा.

हे जग चांगले आणि वाईट यांचे मिश्रण आहे. जे आपल्यासाठी चांगले आहे तेच विचारपूर्वक ग्रहण केले पाहिजे. राजहंस जसा समोर ठेवलेल्या दूध व पाण्याच्या मिश्रणामधून केवळ दुधाचेच सेवन करतो अगदी तसेच! अभ्यासात आई, वडील व शिक्षक वेळोवेळी आपल्याला मार्गदर्शन करतात, पण यशासाठी प्रयत्न मात्र आपल्यालाच करावे लागणार आहेत.

सर्वप्रथम इंद्रिय व मनाला नियंत्रित करून त्यांना चांगल्या सवयी लावणे आवश्यक असते. त्यामुळेच आपले शारीरिक व मानसिक बळ वाढून आपण ज्ञानार्जन करण्यास समर्थ होतो. म्हणूनच स्वामी विवेकानंद म्हणत, **'तुम्हीच तुमच्या भाग्याचे निर्माते आहात.'** सर्व श ती आपल्यामध्येच विद्यमान आहे. स्वत:च्या प्रगतीसाठी इतरांवर अवलंबून न राहता आपण स्वत:च प्रयत्न केले पाहिजेत. अभ्यास आपला आपण करायला शिकणे; त्यासाठी आईवर अवलंबून न राहाणे, स्वत:ची छोटी–

नको सोन्याचा मुकुट, नको चांदीचा देव्हारा । देव म्हणे, 'सचोटीचे आचरण हवे व्यवहारा' ।।

❊ **आदरांजली...**मुंबईच्या इतिहास व संस्कृतीपर पुस्तके लिहिलेले ज्येष्ठ लेखक शरद द्विवेदी– ५ फेब्रुवारी २०१२❊

प्रायोजक – श्री. अजित भिडे (डायरे टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि.) पुणे ☏ २५३८०४०६

मोठी कामे आपली आपण करणे, घरकामात आईलादेखील मदत करणे यांसारख्या कृती म्हणजे स्वामी विवेकानंदांचे विचार आचरणात आणण्याची सुरुवात होय.

आपण सर्वकाही करू शकतो असा दृढवि ास आपल्यामध्ये असला पाहिजे. आपण स्वत:ला कधीही दुर्बल समजू नये. आपण आपल्यावरील विश्वास जेव्हा हरवून बसतो तेव्हाच आपल्याला जीवनात अपयश येते. परीक्षेत अपयश आले किंवा हवे ते मिळाले नाही म्हणून आत्महत्या करण्याचा विचार करणारी मुले स्वत:वरचा विश्वास हरवून बसलेली असतात. स्वामी विवेकानंद म्हणतात, **'विश्वास, विश्वास, विश्वास! स्वत:वरील विश्वास त्याचबरोबर ईश्वरावर विश्वास, हेच महान होण्याचे रहस्य आहे.'** जीवनात अपयश जरी आले तरी आपण त्याचा धैर्याने सामना केला पाहिजे. अपयश ही यशाकडे घेऊन जाणारी पहिली पायरी होय. कोणत्याही कठीण प्रसंगी खचून न जाता त्यामधून जो मार्ग काढतो तोच खरा बुद्धिमान होय.

स्वामी विवेकानंद म्हणतात, **'जे दुसऱ्यांसाठी जगतात तेच खऱ्या अर्थाने जिवंत असतात, बाकी सर्व जिवंत असूनही मेल्यासारखेच होत.'** इतरांची सेवा केल्यानेच आपले जीवन धन्य होत असते. भगवान श्रीकृष्ण गीतेत म्हणतात, *'जो इतरांच्या कल्याणासाठी थोडे जरी प्रयत्न करतो त्याची कधीच दुर्गती होत नाही.'* आज आपले लाखो देशबांधव दारिद्र्यात खितपत पडले आहेत. त्यांना दोन वेळेला पोटाला पुरेसं अन्नसुद्धा मिळत नाही. देशाला स्वातंत्र्य मिळून ६० वर्षे झाली तरी अजूनही आपल्या मूलभूत गरजा आपण पूर्ण करू शकलो नाही.

आपल्या गरीब बांधवांची सेवा करण्यासाठी स्वामीजींनी रामकृष्ण मठ व मिशनची स्थापना केली. मात्र, आपल्या गरीब बांधवांसाठी आपण काय करीत आहोत? त्यांच्यासाठी विचार करायलासुद्धा आपल्याला वेळ नाही. केवळ स्वत:च्या स्वार्थापलीकडे आपण काहीच बघू शकत नाही. आपल्या हृदयात त्यांच्याबद्दल प्रेम नाही, सहानुभूती नाही व त्यांची सेवा करण्याची इच्छासुद्धा नाही. अगदी आपल्या पानात वाढलेल्या अन्नाचा नास न करणं इथपासून सुरुवात करून ते गरजू व्य तीला आपण कशाप्रकारे उपयोगी पडू शकू, याचा विचार आपण सतत करायला हवा. दानाची व्याख्या नव्या काळानुसार बदलायला हवी.

धर्माचे मर्म जर आपल्याला कळले असते तर आपण कधीच असे वागलो नसतो. ईश्वर केवळ मंदिरातच नसून सर्वांच्या हृदयात विराजमान आहे. म्हणून इतरांची सेवा करणे म्हणजेच जिवंत ईश्वराची पूजा होय. हे तत्त्व सर्वच साधुसंतांनी आपल्याला सांगितले; पण आपण मात्र ते विसरून गेलो. संत तुकाराम म्हणतात,

'दया करणे जे पुत्रासी, तेचि दासा आणी दासी,
तुका म्हणे सांगू किती, तेची भगवंताच्या मूर्ती'

आपण स्वत:वर जसे प्रेम करतो तसेच इतरांवरसुद्धा केले पाहिजे. त्याची सुरुवात अगदी शाळा आणि घर इथपासूनसुद्धा आपण करू शकतो. अडचणीत असलेल्या आपल्या मित्रांना मदत करणे, शेजारी एकेकटे राहणारे आजी-आजोबा, आपल्या घरी कामाला येणाऱ्या मावशी, भाजीवाले, रिक्षावाले काका, आपल्या राहत्या इमारतीचे सुरक्षा कर्मचारी यांच्याशी प्रेमाने बोलणे, त्यांच्या वयाचा मान राखून बोलणे या साध्या साध्या गोष्टी तुम्ही मुलांनी आत्मसात करायला हव्यात.

थोड यात, स्वत:च्या व्य तिमत्त्वाचा विकास करण्यासाठी मन व इंद्रियांना संयमित करून एकाग्रता वाढविणे, वाईट सवयींचा त्याग करून विचारपूर्वक चांगल्या सवयी लावून घेणे, जीवनातील सर्व समस्यांचा धैर्याने सामना करणे, आत्मविश्वास वाढवून जीवनात यश संपादन करणे, स्वत:चा स्वार्थ सोडून इतरांना मदत करणे, हृदयातील ईश्वराला प्रसन्न करण्यासाठी त्याचे स्मरण-चिंतन करणे व आपल्या सद्बुद्धीसाठी प्रार्थना करणे आणि संतसाहित्याचे अध्ययन करणे, हेच स्वामी विवेकानंदांना नवीन पिढीकडून अपेक्षित होते. स्वामीजींचे हे विचार समजावून घेऊन आचरणात आणणं, हीच आजच्या काळाचीही गरज आहे.

* *

- स्वामी श्रीकांतानंद
रामकृष्ण मठ, १३१/१अ, दांडेकर पुलाजवळ, पुणे 411030
rkmpune@gmail.com

रे पाखरा

निळा-जांभळा सावळासा
कुण्या देशीचा तू पाहुणा?
कुंपणावरती बसून
शोधतोस इथे तू कुणा?

इवलेसे शरीर तुझे
इवलाली तुझी शेपटी,
अवचित तुझ्या येण्याने
मोहरली माझी खोपटी

स्वागत तुझे करतोय
हसून गुलाब अंगणी,
तुळस डोलविते काया
लता लाजते मनोमनी

सकाळच्या प्रसन्न वेळी
प्राज ताचा सुटला वास,
बागडायचे सोडून तू
दिसतोस का रे उदास?

कुठे जायचे होते तुला
अशी कशी चुकली दिशा?
हरवून भाऊबंदांना
काय झाली रे मनोदशा?

भुकेला असशील रे तू
ये चार तांदळाचे दाणे
विसरून साऱ्या दु:खांना
गा पुन्हा आनंदाचे गाणे

– मुबारक शेख, १६२/८ ब, आळंदकर चाळ, रेल्वे लाईन, सोलापूर 413001   चित्रकार – **तनया शिरसीकर**

किस्से थोरामोठ्यांचे...

उदार दृष्टिकोन

पाटणा स्टेशनवरून आगगाडी सुटणार होती. एक मिशीधारी व्य ती आगगाडीच्या सर्वसामान्य डब्यात चढली. त्या डब्यात ५-६ विद्यार्थी गप्पा मारत होते. त्यांच्या चेष्टा-मस्करीला उधाण आले होते. ते विद्यार्थी त्या मिशीधारी व्य तीची सारखी टर उडवत होते. पण ती व्य ती गप्प बसून ऐकत होती. ती मुलं त्यांच्या सहनशीलतेची जणू सीमा पाहात होते. तेवढ्यातच तिकीट तपासनीस आला. सगळे एकदम गप्प बसले. त्या विद्यार्थ्यांजवळ तिकीटे नव्हती. ''विना तिकीट प्रवास करायला लाज नाही वाटत?'' असे विचारत तिकीट तपासनीस त्यांना दरडावू लागला. अभद्र भाषेत शिव्या देऊ लागला. मिशावाल्या व्य तीने त्यांना जो काही दंड आणि तिकिटाचे पैसे द्यावयाचे होते ते तिकीट तपासनीसाला दिले आणि ती मिशाधारी व्य ती म्हणाली, ''कृपा करून अभद्र भाषा वापरू नका.''

ते विद्यार्थी आणि डब्यातले इतर प्रवासी त्यांचे ते औदार्य आणि सालसपणा पाहून चकीत झाले. मुगलसराई स्टेशन आले आणि ती व्य ती उतरू लागली. डब्याबाहेर गर्दी जमली होती आणि त्या व्य तीला पाहून आरोळी दिली गेली, 'डॉ. राजेंद्र प्रसाद जिंदाबाद-जिंदाबाद !'

सगळा विद्यार्थीगण खजील झाला. त्यांना आपल्या कृत्याची लाज वाटली. त्यांचे पश्चातापी चेहरे पाहून राजेंद्र बाबू म्हणाले, ''हे वयच असं असतं. पण तुमची ही युवाश ती तुम्ही दुसऱ्यांची टिंगल-टवाळीमध्ये खर्च करण्यापेक्षा ती देशहितासाठी वापरा, ती विधायक कार्यासाठी वापरा. ते तुम्हाला अधिक शोभून दिसेल.''

ते विद्यार्थी नतमस्तक झाले. त्यांना त्यांच्या कृत्याची लाज वाटली आणि तिथल्या तिथे त्यांनी देशसेवेची शपथ घेतली.

– केशव फडणीस, 'हिमांशु' ९४७/१ ब, कर्वे रस्ता, पुणे 411004

डोंगरामधली इवली धार, होते जेव्हा विराट । सस्यश्यामल धरती सारी, तृप्त दोन्ही काठ ।।

✲ आदरांजली... हिंदी चित्रपट अभिनेत्री अचला सचदेव – २९ एप्रिल २०१२ ✲

दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा. **प्रायोजक – डॉ. कीर्ती आपटे, पुणे.**

'रेझांग ला'ची लढाई

प्रफुल्ल कुलकर्णी

१९६२ सालच्या भारती–चीन युद्धातील पराभव ही प्रत्येक भारतीयांच्या जिव्हारी लागलेली घटना!

या काळवंडलेल्या इतिहासालाही एक प्रखर सोनेरी कडा होती; ती म्हणजे 'रेझांग ला' ची यशस्वी लढाई !

या युद्धाला यावर्षी ५० वर्षे पूर्ण झाली. इतिहासाचा अभ्यास करताना तेव्हाच्या पराभवाची चिकित्सा करायला हवीच पण त्याचबरोबर प्रेरक इतिहासाचे स्मरणही करायला हवे. काय घडलं होतं 'रेझांग ला' च्या आघाडीवर?

वाचूया या इतिहासाच्या काही प्रेरणादायी आठवणी...

यावर्षी भारत–चीन युद्धाला ५० वर्षे पूर्ण होत आहेत. या युद्धात भारताला लाजिरवाण्या पराभवाला तोंड द्यावे लागले. प्रचंड प्रदेश गमवावा लागला. हजारो जवान शहीद झाले; पण पराभवाची मोठीच नामुष्की पदरी आली.

युद्धाच्या तयारी–मध्ये झालेली हलगर्जी, नेतृत्वामध्ये असलेला खंबीरतेचा, एकसूत्रीपणाचा अभाव, सैनिकी निर्णयांमध्ये राजकीय हस्तक्षेप अशी अनेक कारणे या पराभवाला होती.

या पराभवाचा अतिशय गंभीर आणि दूरगामी परिणाम भारतीयांच्या मानसिकतेवर झाला. त्यातील महत्त्वाचा परिणाम हा की, भारतीय लोक स्वत:ला चिनी लोकांपेक्षा कमी समजू लागले. 'चीन सर्वच बाबतीत आपल्यालापेक्षा सरस आहे'; हा एक प्रकारचा न्यूनगंड संपूर्ण भारतीय समाजामध्ये अतिशय दृढमूल झाला. उद्योग, व्यापार, सैनिकी सामर्थ्य, क्रीडा नैपुण्य यांपैकी कोणत्याच क्षेत्रात भारत चीनच्या पुढे टिकाव धरू शकणार नाही. अशी जणू धारणाच झाली.

या संग्रामाबाबतचा हा अर्धवट, कचखाऊ असा इतिहास आपल्यापुढे सातत्याने मांडला गेला. पण याच संग्रामामधला दुसरा प्रखर तेजस्वी पण दुर्लक्षित असाही एक भाग आहे जो आपण सर्वांनी माहीत करून घेतला पाहिजे.

आज अशाही एका अद्वितीय घटनेला यावर्षी बरोबर ५० वर्षे पूर्ण होत आहेत. ती म्हणजे 'रेझांग ला'ची लढाई !

चीनने ऑ टोबर १९६२ मध्ये जसे ईशान्येकडील अरुणाचल प्रदेशावर आक्रमण केले, तसेच आक्रमण भारताच्या उत्तरेकडील लडाख–वरही नोव्हेंबर १९६२ मध्ये केले. पण येथे चीनी सैनिकांना अरुणाचलपेक्षा वेगळा अनुभव आला. अरुणाचल येथे युद्धासाठी भारतीय सेना बिलकुल सज्ज नव्हती. तर लडाख येथे भारतीय सेनेकडून चिनी सैनिकांना जबरदस्त प्रतिकार झाला. येथील भारतीय लष्करी नेतृत्व अतिशय खंबीर होते, प्रेरणादायी होते आणि त्यामुळे लडाखमध्ये घनघोर लढाया झाल्या. त्यामधील सर्वात महत्त्वाची म्हणजे 'रेझांग ला' ची लढाई.

'ला' म्हणजे खिंड, रेझांग खिंडीच्या परिसरात झालेली ही लढाई सामाजिकदृष्ट्या फार महत्त्वाची होती. जवळच 'चुशुल' या गावी विमानतळ आहे. भारतीय रसद पुरवठ्यासाठी त्याचे महत्त्व फार मोठे होते. या रेझांग खिंडीचे संरक्षण करण्याची जबाबदारी

चुशुल विमानतळाजवळील स्मारक

'१३ कुमाऊँ' या बटालियनकडे दिलेली होती. १८००० फूट उंचीवरील या खिंडीवर चिनी सैन्याने १८ नोव्हेंबरला चढाई केली. तेव्हा तापमान होते −२४°C! चिनी सैनिकांच्या लाटांवर लाटा पुढे सरकू लागल्या. चिनी फौज होती ५ ते ६ हजारांच्या दरम्यान, तर त्यांना तोंड देण्यासाठी सज्ज असलेल्या १३ कुमाऊँच्या चार्ली (C) कंपनीमध्ये जवान होते फ त १२०. होय, ५/६ हजार विरुद्ध १२० असा हा विषम लढा होता. भारतीय सैनिकांची तुकडी खिंडीच्या बाजूच्या ज्या पर्वतरांगेवर उभी होती त्या जागेच्या मागे प्रचंड मोठा कडा होता व त्या कड्याच्या मागे आपले तोफदळ होते; पण मध्ये असलेल्या कड्याच्या उंचीमुळे ते आपल्या जवानांना संरक्षण देऊ शकत नव्हते. चिनी तोफदळ मात्र त्यांच्या पायदळाला संरक्षण देत भारतीय सैनिकांवर सतत तोफांचा भडिमार करत होते.

या १३ कुमाऊँच्या चार्ली कंपनीचे प्रमुख होते मेजर शैतानसिंग. त्यांच्या अधिपत्याखाली लढणारे जवान होते, हरयाना प्रांतातील रेवडी जिल्ह्यातील यादव, ज्यांना 'अहिर' म्हणतात. ही सर्व यादव मंडळी एकाच प्रदेशातील, एकमेकांचे मित्र, नातेवाईक वा शेजारी असलेली व स्वत:ला भगवान श्रीकृष्णाच्या यादव कुळातली मानणारी, भगवान श्रीकृष्णावर अपार श्रद्धा असलेली !

आक्रमणाला सुरुवात झाली, तेव्हा चार्ली कंपनीला आदेश मिळाले, ते अखेरपर्यंत खिंड लढवण्याचे! परिस्थितीचे गांभीर्य प्रत्येकालाच माहीत होते. शत्रू संख्येने भारी आहे हेही सगळ्यांना माहीत होते. मेजर शैतानसिंहनी सर्वांना विचारले, 'कोणाला परत जायचे आहे? ज्यांना जायचे असेल त्यांनी आताच जावे, नंतर कोणीही जाऊ शकणार नाही. मरेपर्यंत लढत लढत आपल्याला झुंजायचे आहे.' एकही जण मागे फिरला नाही. शेवटच्या जवानापर्यंत व बंदुकीतील शेवटच्या गोळीपर्यंत लढण्याचा निश्चय प्रत्येकाने केला.

चिनी सैन्य पुढे सरकू लागताच चार्ली कंपनीने त्यांच्यावर लाईट मशीन गनने (LMG) जबरदस्त हल्ला चढवला. मोठी हानी झाल्यामुळे चिनी सैन्याला माघार घ्यावी लागली. एका पाठोपाठ एक असे चार हल्ले भारतीय तुकडीने परतवले; पण भारतीय सैन्याची सुद्धा मोठी हानी होत होती. चिनी तोफदळाच्या माऱ्यामुळे अनेक जण जखमी झाले, अनेक जण मृत्युमुखी पडले. त्यामुळे चिनी सैन्याला पुन्हा चेव चढला. ते चाल करून येतच राहिले.

आता शत्रू फारच जवळ आला आहे, हे बघून LMG चालक हवालदार निहालसिंगांनी LMG

✲ आदरांजली... सुप्रसिद्ध गझलगायक मेहेंदी हसन – १३ जून २०१२ ✲
प्रायोजक – श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे.

स्वत:च सुटी केली व चिन्यांच्या हातात ती पडू नये म्हणून तिचे सुटे भाग वेगवेगळ्या बाजूंना फेकून दिले. निहालसिंग स्वत: जबर जखमी झाले. त्यांचे दळणवळण साहाय्यक (Radio Man) रामचंद्र यादव हेही जखमी झाले. त्यांचा रेडिओ संपर्क तुटला.

शत्रू आपल्या ठाण्यापर्यंत येऊन पोहोचला. कोणत्याही परिस्थितीत मेजर साहेब शत्रूच्या हातात सापडू नयेत, म्हणून स्वत:च्या जखमांची पर्वा न करता रामचंद्र यादव ने स्वत:च्या रायफलचा पट्टा सोडवला व मेजर शैतानसिंगांचे शरीर स्वत:ला बांधून घेतले. मेजरसाहेब वाचण्याची श यता अजिबात नव्हती; पण ते शत्रूच्या हाती पडू नयेत म्हणून त्यांना घेऊन घसरत घसरत ५०० यार्ड लांब एका मोठ्या दगडाआड आणून त्यांना लपवून ठेवले. मग मेजरसाहेबांनी या लढाईची कहाणी सांगण्यासाठी मुख्य ठाण्याला जायला रामचंद्र यादवांना सांगितले व स्वत: प्राण सोडले.

इकडे प्रत्यक्ष खिंडीत हातघाईची लढाई सुरू झाली. ठाणे ताब्यात घ्यायला आलेल्या चिनी सैनिकांवर भारतीय जवानांनी बंदुकीच्या संगिनींनी हल्ला चढवला. संगिनी चिन्यांच्या पोटात खुपसून मारायला सुरुवात केली. पण थंडीच्यापासून बचाव करण्यासाठी चिन्यांनी घातलेल्या जाड कोटांमधून संगिनी आत घुसेनात. ते बघून पहिलवान नाईकसिंग राम चवताळला. त्याने चिनी सैनिकांना हाताने धरून त्यांची डोकी एकमेकांवर आपटून मारायला सुरुवात केली. अनेकांना त्याने मोठ्या खडकावर आपटून मारले.

अखेर ५ तासांच्या धमासान युद्धानंतर भारतीय प्रतिकार थंडावला. १२० जणांच्या तुकडीतले ११४ जण मृत्युमुखी पडले, ५ जण जखमी अवस्थेत चिनी सैन्याच्या तावडीत सापडले व फ त १ जण म्हणजे रामचंद्र यादव ही कहाणी सांगायला मुख्य ठाण्यापर्यंत पोहोचले. तुलनेनं चिनी सैन्याचीही हानी मोठ्या प्रमाणात झाली. बाजारात फळांचा सडा पडावा तसा चिनी सैनिकांच्या प्रेतांचा सडा पडला होता. सुमारे १४०० सैनिक मरण पावले होते. १२० जवानांनी १४०० चिन्यांना कंठस्नान घातले. जखमी किती झाले

रेझांग ला – १३ कमाऊँ मधील वीरांचे स्मारक

याची तर गणनाच नाही. दिल्लीतल्या अधिकाऱ्यांना रामचंद्र यादवांनी सांगितलेली ही हकिकत पटेच ना ! खोटे बोलल्याबद्दल व पळून आल्याबद्दल त्यांच्यावरच खटला (Court Marshall) भरण्याची धमकी त्यांना देण्यात आली. रेवडी भागातले गावकरी सुद्धा रामचंद्र यादवांना 'भगोडा' म्हणजे पळपुटा समजू लागले. कारण त्या भागातला प्रत्येक सैनिक शहीद झाला होता मग हाच तेवढा कसा वाचला असा प्रश्न गावकऱ्यांना पडला होता. खरेच होते ते, रेवडी भागातल्या प्रत्येक घरातले कोणीतरी नातेवाईक युद्धात शहीद झाले वा जखमी होऊन चिन्यांच्या अटकेत पडले होते.

१३ कुमाऊँच्या जवानांचे बलिदान फुकट गेले नाही. भारतीय सैन्याच्या तिखट प्रतिकाराचा जो चटका चिनी सैन्याला बसला, त्यामुळे आगेकूच करून संपूर्ण लडाख ताब्यात घेण्याची योजना त्यांना गुंडाळून ठेवावी लागली. विजय मिळाला तरी त्यांची हानीही प्रचंड झाली होती. एका भारतीयाच्या बदल्यात त्यांना दहा चिनी सैनिकांचे मोल मोजायला लागले होते. मिळालेला विजय पदरात पाडून त्यांनी एकतर्फी युद्धविरामाची घोषणा करून टाकली. 'रेझांग ला' च्या लढाईमुळे 'चुशुल' वाचले. तसेच लडाखचा बहुतांश भाग वाचला.

रामचंद्र यादव यांचा वृत्तांत पडताळून पाहण्यासाठी

रेवडी गावातील 'रेझांग ला' लढाईतील वीरांचे स्मारक

युद्धविरामानंतर सुमारे तीन महिन्यांनी आंतरराष्ट्रीय रेड क्रॉस व भारतीय सैन्याने या भागाची पाहणी केली. तिथे त्यांना काय आढळले? कडा याच्या थंडीमुळे तीन महिन्यानंतरसुद्धा युद्धविरामाच्या वेळी सैनिकांचे देह ज्या अवस्थेत होते ते जसेच्या तसेच होते. मृत्युमुखी पडलेल्या कोणाही भारतीय सैनिकाकडे बंदुकीची एकही गोळी शिल्लक नव्हती. अनेक भारतीय सैनिकांच्या प्रेताच्या हातात फेकण्यासाठी उगारलेला हात बॉम्ब जसाच्या तसा होता. कोणी शत्रूच्या पोटात संगीन खुपसण्याच्या आवेशात होते तर कित्येकांनी मरतानासुद्धा शत्रूवर रोखलेली बंदूक घट्ट धरून ठेवलेली होती. मेजर शैतानसिंगांचा खडकाआड दडवून ठेवलेला देहसुद्धा जसाच्या तसा होता.

आणखी एक गोष्ट होती, भारतीय सैनिकांच्या पराक्रमामुळे स्तिमित झालेल्या चिनी सैनिकांनी एक बंदूक जमिनीत उलटी खुपसून त्यावर एक हेल्मेट घातले होते व भारतीय सैनिकांना अभिवादन करणारी चिठ्ठी त्या बंदुकीला लावून ठेवली होती. प्रत्यक्ष शत्रूनेसुद्धा भारतीय सैनिकांना हा सन्मान दिला होता! कोणाही भारतीय सैनिकांच्या देहात पाठीमागून गोळी घुसलेली नव्हती. सर्वजण शत्रूचा सामना करत-करतच मृत्यूला सामोरे गेले.

हे दृश्य पाहून कसलेले, योद्धे असलेले ब्रिगेडिअर रैना जे पुढे भारतीय सेना प्रमुख झाले, त्यांनासुद्धा अश्रू अनावर झाले. या १३ कुमाऊँ तुकडीला १ परमवीरचक्र, ४ वीरचक्रे व ४ सेनापदके देऊन गौरवण्यात आले. असा सन्मान वचितच कोणा तुकडीला मिळाला असेल.

या चीनच्या युद्धानंतर लता मंगेशकरांनी जे अमर गीत गायले - 'ए मेरे वतनके लोगों' त्यातील 'दस दस को एकने मारा....' हा भाग 'रेझांग' च्या लढाईला उद्देशून आहे. हिंदी चित्रपट सृष्टीच्या इतिहासातील एकमेव खराखुरा युद्धपट 'हकीकत' याच लढाईवर आधारित आहे.

पराभवातून धडा शिकण्यासाठी पराभवाची कारणे शोधलीच पाहिजेत, पराभवाच्या कारणांची चिकित्साही झाली पाहिजे. त्याचबरोबर पुन्हा पराभव होऊ नये म्हणून प्रेरक असा इतिहासही पुढच्या पिढीला सांगितला गेला पाहिजे. त्यातून प्रेरणा घेऊन नवे तरुण-नौजवान मायभूमीच्या सेवेसाठी सज्ज होतील.

पण आपण या वीरांची स्मृती काय ठेवतो? ज्या वीरांचा शत्रूने देखील सन्मान केला, त्या वीरांचे जे छोटेसे स्मारक रेवडी भागात उभारले गेले आहे, त्याची अक्षरश: दुर्दशा झालेली आहे. तिथे कचऱ्याचे ढीग पडलेले असतात. प्रत्यक्ष ज्या गावांमधले हे वीर होते तेथेच ही त्यांची उपेक्षा तर दूरपर्यंतच्या ठिकाणी कोण त्यांचा पराक्रम लक्षात ठेवणार? 'नाही चिरा नाही पणती' अशी त्यांची अवस्था आपण किती काळ ठेवणार? या वीरांचे हे बलिदान, ज्याने पुढील इतिहास बदलला त्याचे स्मरण आपण जपणार की नाही?

* *

प्रफुल्ल कुलकर्णी

१२४८, शुक्रवार पेठ, टिळक रस्ता,
सुभाषनगर गल्ली क्र. ५, पुणे 411002

(इंडियन ए सप्रेस मधील श्री. शेखर गुप्ता यांच्या लेखावर आधारित)

भारत-चीन युद्धावरची काही पुस्तके आवर्जून वाचा!

- **वालाँग** - ले.- शाम चव्हाण, राजहंस प्रकाशन
- **चीनचे आक्रमण** - ले. - पन्नालाल सुराणा
- **चिनी आक्रमणाचा प्रतिकार** - ले.-श्री. ह. भिडेशास्त्री
- **माओचे लष्करी आव्हान** - ले.- दि. वि. गोखले

* आदरांजली... राष्ट्रीय स्तराचे ज्येष्ठ कुस्तीपटू व अभिनेते - दारासिंग - १२ जुलै २०१२ *

प्रायोजक - डॉ. संतोष काकडे, बंगळुरू.

ऋतू येतात, जातात; पण पावसाळा म्हटलं की, लहानपणीच्या – शाळेतल्या कोवळ्या आठवणी इतकी वर्षं झाली तरी अजूनही लेखकाच्या मनात ताज्या होतात... त्या आठवणी मग विलक्षण तरलतेने कागदावर उतरतात...

कागदी होड्या

मल्हार अरणकल्ले

आकाशाच्या ढोलीतून बाबाजवळच्या डोंगरावर काळाकुट्ट महाकाय ढग येऊन बसलेला असे. डोंगरामागील खोल दरीतही त्याचे भाईबंद थांबलेले असत. शिकारीच्या तयारीत असलेलं मांजर निश्चल राहून जसा दबा धरून बसतं, तसंच बस्तान ढगानं डोंगरमाथ्यावर बसवलेलं असे. गावातल्या मूठभर रस्त्यांतून ये-जा करताना ढगाचा खट्याळ चेहरा हमखास दिसायचाच. वेगवेगळ्या ठिकाणाहून त्याची वेगवेगळी रूपं दिसत. काही मोठी, काही उंच सुळ यासारखी. काही पसरट काहिलीसारखी. काही दाट. काही विरळ. गालांचा चंबू करून फुगा फुगवताना, तो आता फुटेल-मग फुटेल असा एक क्षण येतो. या ढगाकडं पाहताना नेमकं तसंच वाटत असे. आणखी काही वेळाने हजारो हात पुढे होतील आणि सगळीकडं पाऊसगाणं नाचू लागेल, असे वाटे. ही प्रतीक्षा कधी दीर्घ काळही लांबलेली राही. शाळेत, शेतात, दुकानात, मित्रांच्या घरांच्या रस्त्यावर दिवसभरात किती तरी येरझारा होत. चाणाक्ष ढग कुठं तरी न की गाठेल, असं वाटे; मात्र हा अंदाज बहुधा नेहमीच हुलकावणी देई. पोत्याची खोळ घेऊन बाहेर पडावं, तेव्हा हा कायम रुसलेला असे आणि जवळ खोळ नसली की चिंब करून टाकी.

आंधळी कोशिंबीर खेळताना मागून येऊन कुणी धपाटा मारावा आणि लगेच तोंड फिरवून अंदाज घ्यायचा प्रयत्न केला, तर तो धपाटा कुणाचा हे कळूही नये, तसंच ढगाबरोबरच्या खेळातही होई. पाऊस अचानकच कोसळू लागायचा. दाही दिशांनी चालून यायचा. उभा-आडवा होऊन धपाटे घालायचा. त्याच्या या धारांशी मनसो त खेळावं, असं खूप वाटे.

मिळवले, या गोष्टीशी त्यांची स्वत:शीच स्पर्धा असे.

कधी कधी तो घरांच्या पत्र्यांवर गारांचा ताशा वाजवू लागे. दाराच्या फटीतून बाहेर डोकावले की रस्ताभर पांढऱ्या लाह्यांचा सडा दिसे. वडीलधाऱ्यांच्या नजरा चुकवून आधी अंगणात, मग पडवीच्या वळचणीला आणि तेथून निघून थेट रस्त्यावर येताना खूप थरार जाणवे. तिथपर्यंत पोहोचण्याआधीच चोरी पकडली गेली, की मग खोलीत नजरकैद व्हावे लागे. आपण डोळा चुकवला, तर भावंडांपैकी कुणी तरी चुगली करी. असा दगाफटका होऊ नये, म्हणून भावंडांशी सतत जुळवून घ्यावं लागे. तरच आपला रस्ता अडचणींविना पार करता येई. पावसाच्या ढगांचा काळेपणा वडीलधाऱ्यांच्या तोंडावर उतरून आल्यासारखे वाटे; कारण पावसात जाऊ नये म्हणून ते सगळे रागावत, तेव्हा त्यांचे चेहरे तसेच भेसूर दिसत. निदान तसं वाटत राही.

पाऊससुद्धा काही कमी खोडकर नसे. हवं तेव्हा तो कोसळायचा नाही. आपण रस्त्यात आहोत, तेव्हा बेटा गायब असे. घरात, शाळेत असं कुठं कुठं जायबंदी झालो, म्हणजेच डोंगरावरून पुढं सरकून ढग उतरून येई. आजूबाजूनं नाचू लागे. वडीलधाऱ्यांची, गुरुजींची नजर चुकवून बाहेर पाहावं, तेव्हा त्याचे भरारते रूप दिसे. गुरुजींनी काळ-काम वेगाची गणितं सुरू केली की, बाहेर पाऊसधारांनी डाव टाकलाच समजावं. पाटीवर लिहून घेतलेल्या गणिताची रीत ठाऊक असूनही आठवत नसे. काळ-काम-वेगाचं गणित पावसानं मात्र अगदी बरोबर सोडवलेलं असे. शाळेचे कोंडवाडे भरले, म्हणजेच तो येई. शाळेच्या कौलांच्या वळचणींतून पागोळ्या घरंगळू लागत आणि बाहेरचा पाऊस मनातही कोसळू लागे. बाहेरची झड आत आत घुसत जाई. मनात वाऱ्याच्या भराऱ्या सुरू होत. ते झोके पकडून पाऊस झुलत राही. पाटीवर गणित आणि मनात नाचणारा पाऊस. मन एकवटून गणिताकडे लक्ष द्यावेच लागे. गुरुजी भारी रागीट होते. 'या मुलांनी चुकताच कामा नये', हे एकच सत्य त्यांना गवसलं होतं. गणितात शंभरापैकी शंभर गुण किती जणांनी

अशी उलघाल सुरू असतानाच, शाळा सुटल्याची सूचना देण्यासाठी शिपाई घंटेकडे चालल्याचे दिसे, तेव्हा कुठं जिवात जीव येई. इतका वेळ दाबून ठेवलेला आनंद एकवटून जाई. शिपायाची सावली खिड यांतून पुढे पुढे सरकू लागली, की शेवटच्या ओळीपासून मुलांची दप्तराची आवराआवर सुरू होई. सगळ्यांची एकद धांदल होई. पाण्याच्या पृष्ठभागावरून एखादी लाट सरकत राहते, तशी दप्तरांचा गाशा गुंडाळण्याची कृती एका ओळीतून पुढच्या ओळीत होत राही. घंटेचा शेवटचा 'टण्' असा आवाज झाला, म्हणजेच वर्गातनं बाहेर पडायची मुभा असे. वर्गाच्या एकुलत्या एका दरवाजात गुरुजी उभेच असत. दप्तरं आवरली तरी उठून उभं राहता यायचं नाही.

मित्र केव्हाच वर्गाच्या बाहेर पडलेले असे. अखेर, घंटेचा टण्-टण् आवाज थांबला की, समूह स्वरात हाकारे देत दरवाजाशी झटापट सुरू होई. एकमेकांची दप्तरे एकमेकांना अडकून राहत. त्यातून सुटका करून घेतल्यावर कमालीचा आनंद होई. बरोबरीचे, घराजवळचे मित्र मात्र थांबलेले असले, म्हणजे ते येईपर्यंतचा वेळही धीर धरवत नसे.

शाळा म्हणजे मोठा चौसोपी वाडा होता. पेशव्यांच्या सरदारांचा. मोठे आंगण. बाहेर पडण्यासाठी

रस्ता कधिच चुकत नसतो, चुकतो सारे आपण । लक्षात आधीच घ्यायचं असतं, कुठे आहे वळण ॥

✻ आदरांजली... आझाद हिंद सेनेतील पहिल्या महिला कॅप्टन लक्ष्मी सेहगल - २३ जुलै २०१२ ✻
प्रायोजक - श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे.

ऐसपैस दरवाजा. शाळा सुटूनही, रस्त्यावर येण्यासाठी काहीसा वेळ लागायचा. तेवढा वेळही खूप मोठा-लांबलचक वाटे.

रस्त्यावर यावं, तर पाऊस गायब झालेला. खूप वाईट वाटे. इतका वेळ धो-धो पडला; आणि आताच नेमका थकून गेला. त्याचा खूप राग यायचा. 'ये रे ये रे पावसा' च्या गिर या घेत 'मोठा पैसा देण्याचे' आश्वासन दिले, तरी पाऊस त्याला दाद देत नसे; मात्र त्याचे जिवंत अस्तित्व रस्त्यांतून खळाळत असे.

हवा चिंब गारठलेली असे. वारा पडला असला, तरी त्याचा झोंबरा काटेरीपणा आजूबाजूला भरलेला असे. नेहमीचे रस्ते बदलून गेलेले असत. त्यांच्या खाचखळग्यांना ओहोळ, ओढे, नदी, समुद्र यांपैकी कुठले ना कुठले रूप लाभलेले असे. उताराच्या रस्त्यांवरून पाण्याचे प्रवाह ओढ्याच्या दिशेने धावत निघालेले असायचे. त्यांत पावलांचे धरण बांधून फुगून जाणारं पाणी पाहताना कमालीचा आनंद होई. मग दप्तराचे कानेकोपरे चाचपून बघितलं जाई. सुटे कागद हाताला लागतात का त्याचा शोध सुरू होई. असे कागद बहुधा जमवून ठेवलेले असायचेच. काही वेळा ही बेगमी संपून गेलेली असे. मग वही बाहेर निघे. शेवटाकडून दोन-चार पानं काढून घेतली जात. त्यांच्या एकामागून एक घड्या आणि नंतर होडी. साधी काटेरी मोठ्या कागदाची ती होडी. छोट्या कागदाची ती नाव.

गावातल्या उंचवट्यावर लगबगीनं पोहोचायचं आणि थेट तेथूनच नावा-होड्या प्रवाहात ढकलून द्यायच्या. वारा झुळझुळ वाहू लागला, म्हणजे होड्यांच्या शिडांतही वारं भरून जाई; आणि होड्या पुढं निघत. होड्यांची पावलं कधी अगदी दमदार पडत. कधी ती धीमी होत. वाऱ्याचं लहरतं बोट पकडून होड्या कधी पोट धरून नाचू लागत. मुलामुलांत होड्यांची अटीतटीची स्पर्धा सुरू होई. खूप पुढे निघून गेलेली एखाद्याची होडी पाहिली, की मागे पडलेल्या होड्यांच्या खलाशांचे चेहरे हिरमुसले होत. पुढे गेलेल्या होड्या एखाद्या दगडाला, लाकडाला अडकून बसत, तेव्हा चित्र उलटं होई. मागच्या होड्या पुढे निघून जात. कधी कधी होड्या प्रवाह सोडून भरकटूनही जात. एखादी होडी डब याच्या समुद्रात हेलकावत राही.

मुलांचा प्रवास होड्यांच्या बरोबरीनं सुरू राही. आपापल्या होड्यांवर बारकाईनं लक्ष ठेवून होड्या हाकारण्याची नवलाई अपूर्व असे. होड्यांच्या गतीने रस्त्यातून पुढं सरकतात गावातल्या घरांचं, रस्त्याच्या चढ-उताराचे, वळणांचे नवे दर्शन होई. त्याआधी हे काही इतके न्याहाळून पाहिलेले नसे. कुणाच्या घराचं दार कसे, खिडकी कशी, उंबरा कसा, अंगण कसे, रस्त्याने कुठे खळगा आहे, कुठले वळण कसे आहे, दगडांचे छोटे-मोठे डोंगर कुठं उगवलेले आहेत, हे सारे अनोखे विश्व होड्यांबरोबरच्या प्रवासात उलगडत जाई.

रस्त्यातून एखादी बैलगाडी आली की, आपल्या होडी जवळून ती सुखरूप पार पडेपर्यंत जिवाची कालवाकालव होऊन जाई. बहुतेक वेळा होडी बचावत असे आणि क्वचितच बैलांच्या पायांत किंवा चाकांच्या धावेखाली येत असे. तसे झाले की, मनाचे पाखरू धपापून गप्प होत असे.

शाळा सुटल्यावर सुरू झालेला होड्यांचा प्रवास चांगला संध्याकाळच्या काळ्या सावल्या दाटून येईपर्यंत सुरू राही. कधी कधी होड्या ओढ्यापर्यंत पोहोचत. मध्येच पावसाने गाठले, तर होड्यांची शिडे माना टाकून जागीच कोमजून जात. रात्री स्वप्नातही ती रडवेली होडीच दिसत असे.

पावसाळा जवळ सरकू लागला की, अजूनही मनातल्या रस्त्यांवरचे ओहळ कागदी होड्यांनी गच्च भरून येतात. वारा वाहू लागतो आणि तो शिडांत भरून घेऊन होड्या ओढ्याच्या ओढीनं धावू लागतात. आठवणींचे रस्ते मग चिंब चिंब होऊन जातात.

* *

- मल्हार अरणकल्ले
१०/२, गुरूजन सोसायटी,
कोथरूड, पुणे 411029

याप्रमाणेच हिवाळा/उन्हाळा या ऋतुंमधले तुमचे अनुभव तुम्ही शब्दांत मांडून आमच्याकडे जरूर पाठवा.

जरा डोकं चालवा...

१	४	५	१	६	८
७	२	९	७	८	६
६	८	३	३	२	५
४	५	६	७	१	४
२	९	७	९	८	९
२	४	१	५	३	३

* शेजारील चौरसातील ३६ घरांमध्ये १ ते ९ अंक प्रत्येकी ४ वेळा वापरले आहेत. या चौरसाचे असे **४ सारखे** भाग करा की प्रत्येक भागातील घरांमध्ये **१ ते ९** हे सर्व अंक एकदाच असले पाहिजेत.

* खाली सहा भौमितिक आकार दिले आहेत. ते एकमेकांना जोडून १ चौरस तयार करा.



मलपृष्ठाच्या आतील पानावरील पद्याचा भावार्थ (भुवनमण्डले)

या जगात सर्वत्र नवीन युगाचा उदय होऊन ते स्वामी विवेकानंदांच्या कृतीने, सुविचारांनी आणि आनंदाने भरून जावे, असा विचार या पद्यातून प्रकट होतो.

आळस, निष्क्रीयता, क्रोध, लोभ इत्यादींनी भरलेल्या या जगात भ ती, ज्ञान, कर्म आणि विज्ञान या सत्त्व गुणांचा उदय होवो. पंचमहाभूतांनी व्यापलेल्या या जगात आपण सर्वजण 'एक कुटुंब' म्हणून राहूया. मत्सर, राग, द्वेष या ऐवजी 'सौहार्द' जपण्याचा आपण सर्वजण प्रयत्न करूया.

परमेश्वराचं रूप सगुण-निर्गुण-एक-अनेक आहे. अशी जरी विविध मतं असली तरी आपण सर्वजण स्वत:ची निष्ठा जपत त्यांची पूजा करूयात हा मानवधर्म वाढीस लावूया.

त्याचप्रमाणे प्रत्येक व्य तीच्या ठिकाणी देवत्व पाहून, लोकसेवा करून हा मानवधर्म, सेवा, त्याग आणि पराक्रम जपण्याचा आपण प्रयत्न करूया.

कठीण शब्दांचे अर्थ

स्वानन्दमयम् – आनंदाने यु त असे **प्रवर्धयतु** – वाढ होवो **समर्चयतु** – अर्पण करून
विकीर्ण – सर्वत्र असलेले, पसरलेले **निष्क्रियताऽऽलस्यग्रस्तम्** – निष्क्रियता व आळस यांनी भरलेले

फसवणूक

–कविता मेहेंदळे

कुठलंही तंत्रज्ञान हे गैरसोय टाळण्यासाठी, आपली सुविधा वाढवण्यासाठीच असते; पण अतिरेकी वापरानं त्याच्या दुष्परिणांमानाही आपल्याला सामोरं जावं लागतं. थोडक्यात ‘अति तेथे माती’ या म्हणीचा प्रत्यय या कथेतील आपल्या मैत्रिणीला आला आहे. वाचूया सोबतची कथा...

बाबांचा नाश्ता झाला आणि ते लॅपटॉप, पाकीट वगैरे उचलण्याच्या नादात असतानाच ऋचानं लाडंलाडं विचारलं, ‘‘बाबा, माझा वाढदिवस पुढच्या आठवड्यात आहे बरं का. गिफ्टचं लक्षात आहे ना? प्लीजऽऽ ज, बाबा मला ‘सेलफोन’ हवाय.’’

‘‘कशाला? ऋचा, माझा आणि आईचा सेलफोन तुला हवा असेल तेव्हा वापरतेसच की तू. त्याला आम्ही ‘नाही’ म्हणतो का?’’

‘‘पण माझ्या वर्गातल्या सात–आठ मुलींकडेही ‘सेलफोन’ आहेत.’’

‘‘असू दे. शाळेतल्या मुलांसाठी फोन ही काही गरजेची गोष्ट नाहीये. ‘सेलफोन’ म्हणजे अभ्यासात व्यत्यय! मन एकाग्र होण्यात अडथळा; असं तुझी आई आणि आजी नेहमी म्हणत असतात.’’

‘‘मला त्यांची मतं माहिती आहेत. पण बाबा मला तुमच्याकडून तरी आशा आहे. बाबूऽ या यंत्रयुगात अशा गिफ्टस् लागणारच ना रे?’’ ऋचाचं वा य पूर्ण व्हायला अन् आई बाहेर डोकवायला एकच वेळ आली. ऋचा एकदम गप्प झाली.

बाबा म्हणाले, ‘‘संध्याकाळी बघू आपण.’’ ऋचा जराशी हसली. नकारातून होकाराकडे नेणारा हा ‘बघू’ नामक प्रवास तिच्या ओळखीचा होता.

ऋचाने सेलफोनसाठी तिच्या बाबांच्या मागे तगादा लावला होता. ऋचाला माहीत होतं की, आईचा या प्रस्तावाला संपूर्ण विरोध आहे. ‘नवी पिढी–नवे हट्ट’, म्हणत आजीने भुवया उडवल्या होत्याच.

त्यातून झालं होतं असं, ऋचाची आतेबहीण शबरी नुकतीच अमेरिकेहून सुटीसाठी येऊन गेली होती. ऋचापेक्षा लहान असणारी शबरी ‘सेलफोन’ वापरत होती. ती ‘शायनिंग’ मारत्येय असंच ऋचाला सारखं वाटायचं, त्यामुळे सेलफोन मिळवून तिला शबरीला खिजवायचं होतं.

***

काही अटींच्या मान्यतेनंतर एकदाचा ऋचाला सेलफोन मिळाला. तिचा आनंद गगनात मावेना. ही सुवार्ता प्रथम तिनं तिच्या जवळच्या मैत्रिणीला अदितीला दिली. वाढदिवसाच्या दिवशी मैत्रिणींमध्ये एकच विषय होता ‘ऋचाचा सेलफोन’. अनुपमा, स्वरदा, गायत्री सतत सेलफोनविषयी प्रश्न विचारून ऋचाला सतावत होत्या. काका, मामी, शेजारचे आप्पा, भेटेल त्या

प्रत्येकाला ऋचा 'सेलफोन नंबर' देत होती. आईसुद्धा लेकीच्या हट्टामध्ये विरघळली होती आणि तिच्या चेहऱ्यावरचं 'रिंगटोन-चांदणं' टिपत होती. ऋचानं जेव्हा शबरीला फोनची बातमी दिली तेव्हा तिला धन्यता वाटली. पुढचे दोन दिवस ऋचा तिच्या आजीला सेलफोनमधल्या 'नानाकळा' समजावून सांगत होती. खेळाच्या मैदानावर, बाकावर बसून ऋचा आता फोनशी जवळीक साधत होती आणि खेळायचं विसरून गेली होती. न राहवून अदिती तिला म्हणाली, ''ऋचा, खो-खो च्या स्पर्धा जवळ आल्यात. खेळायला ये. वेडपटासारखी त्या सेलफोनकडे बघत काय बसतेस?''

''अदिती, तुला नाही कळणार यातली गंमत.''

''ते खरंय, पण खेळातही मजा असतेच ना ! त्या सेलफोनला नंतर कुरवाळत बैस.''

''तू खेळ गं. मी फोनचे नवे फीचर्स बघत्येय''

''सबबी सांगू नकोस.''

''नाही गं अदिती. एवढा घेतलाय फोन, तर वापरता आला पाहिजे ना व्यवस्थित?''

''कमाल आहे ऋचा. आई-बाबांचे फोन वापरतानाच मेसेजेस पाठवणं, फोटो काढणं, गाणी लावणं सगळं सवयीचंच आहे की !''

''असू दे. प्रत्येक फोनच्या करामती वेगळ्या!''

''की तुझ्या तऱ्हा वेगळ्या?''

एवढं बोलून अदिती खेळायला निघून गेली. दिवसेंदिवस ऋचाला मैदानावरच्या खेळांचा कंटाळा यायला लागला. तिथेच बाकावर बसून वेफर्स खावेत किंवा फोन करावेत असा तिचा परिपाठ सुरू झाला. आता पॉकेटमनी, खाऊचे पैसे हा सेलफोनच खायला लागला.

नेहमीप्रमाणे दिवाळी आणि ऋचाचा वाढदिवस झाल्यावर आजी कोकणात दापोलीला गेली. आता ऋचाच्या घरी तिची वाट पाहणारं, जातीनं विचारपूस करणारं कोणीच नव्हतं. आई-बाबा नोकरीवर जाणारे; संध्याकाळी मावळल्यासारखे होऊन घरी यायचे. शाळेतून घरी यायचं आणि दूध पिऊन, कपडे बदलून मैदानावर खेळायला जायचं, ही ऋचाची लहानपणापासूनची सवय. त्यामुळे ग्राऊंडवर जाऊन प्रत्यक्ष खेळामध्ये सहभागी झाली नाही, तरी ऋचाला तिथं जाणं टाळायचं नव्हतं. आपण हल्ली खेळत नाही, याचंही तिला विशेष काहीच वाटत नव्हतं. ग्राऊंडवर जाता-येता अदितीबरोबर गप्पा व्हायच्या. एरवी ग्राऊंडवर अदिती, ऋचाचा ग्रुप खो-खो, लंगडी किंवा कबड्डी खेळायचा. इथे फी भरायची नव्हती की, कोणतीही बांधिलकी नव्हती. त्याचाच फायदा घेऊन ऋचा आळसावली होती. निमित्त सेलफोनचं झालं न् ऋचाचं खेळातलं लक्ष पुरतं विचलित झालं. तिच्या अभ्यासावरही या कंटाळ्याचं सावट पसरलं.

एक दिवस शाळेमध्ये स्वरदाने 'बार्बी इन् द प्रिन्सेस चार्म स्कूल' ची गोष्ट रंगवून रंगवून ऋचाला सांगितली. तिने ऋचाला आणखी काही गोष्टी पाहायला-ऐकायला बोलावलं. स्वरदाचं घर ग्राऊंडच्या थोडसं पुढं होतं. ऋचा तिच्याकडे गेली. ऋचा, स्वरदा कार्टून फिल्म्स्मध्ये रंगल्या. मग काय, रोज शाळा सुटल्यावर संध्याकाळी ग्राऊंडवर जायला निघायचं. अदितीबरोबर तिथवर यायचं. अदिती ग्राऊंडवर खेळायला जायची. ऋचा स्वरदाकडे जायची आरामात कार्टून फिल्म बघून मग ग्राऊंडवर यायची.

ऋचा हल्ली स्वत:च्याच नादात असायची. घरातही एकाजागी गुपचूप बसायची. पूर्वी घरभर तिचं नाचणं, तिचा वावर, तिची बडबड चालू असायची न् घराला 'जाग' असायची. आताशा, ना तिला अभ्यासात शंका असायच्या, ना कोणा आल्यागेल्याची खबरबात! एके दिवशी आईनं विचारलं -
''ऋचा, काय झालंय काय? ग्राऊंडवरूनच आलीस ना?''

''हो मग?''

''खेळून दमून, धपापत यायचीस तू. घटाघटा पाणी प्यायचीस. 'हुशऽऽश' करत सोफ्यावर बसायचीस. खेळातल्या हकिकती सांगायचीस. आताशा निवांत असतेस. खेळामध्ये रस वाटत

नाहीये का? काही बिनसलंय का तुझं?''

''आई, सगळं नीट चाललंय. तू उगीचच काळजी करतेस. आदिती न् मी रोज ग्राऊंडवर जातो, आम्ही खेळतो गं.''

''शाळेमध्ये सगळं ठीक आहे ना? तुला काही 'वेगळं' वाटतंय का? ऋचा, बेटा माझ्याजवळ मोकळेपणानं बोल.''

''तसं काही असेल तर मी तुलाच आधी सांगणार ना आई?'' म्हणत ऋचानं आईच्या कमरेभोवती हात टाकला.

...संक्रांत सणासाठी आजी अगदी आयत्यावेळी आली. आजी आल्याबरोबर गुळाच्या पोळ्या, तिळाच्या वड्यांची लगबग सुरू झाली. विशेष म्हणजे गुळाच्या पोळ्यांसाठी आजीने डब्यात भरून घट्ट, कणीदार साजूक तूप आणलं होतं. सगळेजण तूप-गुळ पोळ्यांवर ताव मारत होते. आजीला तिच्या मैत्रिणीची मंजुळाची आठवण झाली न् तिला फोन करण्यासाठी आजीनं ऋचाकडे फोनची मागणी केली. ऋचाने जिथे-तिथे सेलफोन शोधला. मग तिच्या बाबांनी तिचा नंबर लावून रिंगटोन वाजतोय का, तेही पाहिलं. पण व्यर्थ ! फोन काही सापडेना. ऋचाचा चेहरा पार पडला. शाळेतून आल्यावर ऋचाने फोन हातात घेतला होता. मग काय ग्राऊंडवर विसरून आली की काय? आई-बाबांनी खूप खोदून विचारलं. ऋचाचं उत्तर होतं, ''चार्जिंग संपलं असेल. फोन घरातच आहे. मिळेल मला.''

आजीनं ऋचाच्या बोलण्यातला पोकळपणा ओळखला होता. सेलफोन हरवलाय किंवा काहीतरी गडबड आहे, असा संशय तिला आला होताच. ऋचाच्या हालचालींवर आजीचं बारकाईनं लक्ष होतं. आज ऋचा ग्राऊंडवर गेली न् आवरून आजीही पाठोपाठ गेली. संध्याकाळी न जाणो तिथेच कुठेतरी पडलेला असायचा फोन !

ग्राऊंडवरून ऋचा आली ती हातामध्ये फोन नाचवतच. ''चुकून माझा फोन अदितीच्या कबड्डी ग्राउंडवर राहिला होता. एकदाचा मिळाला. '' ऋचा पुन्हा पुन्हा सांगत होती. आजीनं सहज विचारलं, ''ऋचा, आज काय खेळलात? दमली असशील ना गं?''

''हो ना आज्जी- आज कबड्डी खेळलो. पाय थोडे-थोडे दुखतात. पण इटस् ओ. के.''

''वा ! वा ! ऋचा, माझी गुणी नात मस्त थापा मारायला शिकलीय की !'' या आजीच्या वा यासरशी ऋचाने गर्रकन मान वळवून आजीकडे पाहिलं.

ऋचा मवाळपणे म्हणाली, ''असं काय म्हणतेस आजी? कमालच करतेस तू !''

''कमाल तू करते आहेस. मी तुझ्या मागोमाग सेलफोन शोधायला ग्राऊंडवर आले होते. तू तिथे खेळत नाहीयेस हे मला कळलं आणि दिसलंही.''

''वाटलंच. अदितीनं चोंबडेपणा केला असणार.''

''नव्हे. मीच चोंबडेपणा केला. त्यामुळे मला खूप गोष्टी नव्यानं कळल्या. तुझ्या हालचालीतली 'लय' हरवली असं यावेळी मला जाणवलं; परंतु त्याकडे मी दुर्लक्ष केलं होतं. सेलफोन आणि स्वरदाबरोबरच्या कार्टून चॅनल्समध्ये रमल्यामुळं तू ग्राऊंडवर खेळायचं पार विसरून गेलीस. तुझ्या थापांना आता 'खोटं बोलणं' असं म्हणतात. तू खेळायला मैदानावर जाते आहेस, असं आईला नुसतं भासवते आहेस. मोकळ्या मैदानावर खेळून शरीरच नव्हे तर मनही तंदुरुस्त राहतं ऋचा.''

''आजी, भलते निष्कर्ष काढू नकोस. आपली शबरीसुद्धा ग्राऊंडवर खेळायला जात नाही.''

''तिची बरोबरी कशाला हवीय? ती तिकडे अमेरिकेत राहते. तिथलं जीवनमान, पद्धती तिथल्या वातावरणला अनुकूल असतीलही. सहा महिने बर्फ असतो तिकडे. इथे मात्र तू अदितीसारख्या गुणी मैत्रिणीला गमावणार आहेस. मला वाईट अशासाठी वाटतंय ऋचा की, तुला हे समजत नाहीये की तू मला, तुझ्या आई-बाबांना फसवत नाहीयेस तर तू तुला स्वत:ला फसवत्येयस. दिवसभर कष्ट करून आम्ही घरची मंडळी तुला शहणी-गुणी चैतन्यरूपात पाहू इच्छितो आहोत. तू मात्र बेगडी, तात्पुरत्या खुशी देणाऱ्या गोष्टीत रमून स्वत:चं

✻ आदरांजली... आंतरराष्ट्रीय स्तराचे ज्येष्ठ हॉकीपटू मेजर शांताराम जाधव - २६ ऑगस्ट २०१२ ✻
प्रायोजक - श्री. शंतनू पटवर्धन, इलिमॉइस, अमेरिका.

नुकसान करून घेते आहेस. अजून वेळ गेलेली नाही. सावर स्वत:ला.''

''अगं पण आजी...''

''तुझा सेलफोन स्वरदाकडे विसरली होतीस. हो ना?''

''हो.''

''तर मग सारवासारवी कशाला? खोटी बतावणी का? ज्यांनी लाडानं तुझा हट्ट पुरवण्यासाठी सेलफोन आणला त्यांनाच फसवतेस?'' आजी तिथून आतमध्ये निघून गेली. ऋचा भांबावली होती. रडवेली झाली होती.

जराशी कावरीबावरी, झालेली ऋचा शाळेमध्ये गेली. आली ती मात्र, दप्तर जागेवर ठेऊन आजीसमोर उभी राहिली. ''आ ी, मी चुकले. भरकटले. मला माफ कर. आजपासून मी ग्राऊंडवर आधीसारखीच खेळायला जाणार. मी आई-बाबांना खरं काय ते सांगणार आहे. ते मला न कीच माफ करतील. आजी, मला कळलंय, एक खोटं लपवताना मी पुन:पुन्हा खोटं बोलत होते. अशी चूक मी पुन्हा करणार नाहीये. आज, अदिती आणि मी, या माझ्या अशा वागण्यावर खूप बोललो. अदितीनंच सुचवलं, 'आई-बाबांना विश्वासात घेऊन खरं सांग.'आणि मला ते मनापासून पटलं.''

''उपरती झाली म्हणायची बाईसाहेबांना!''

''उपरती म्हणजे काय ते नंतर सांग. आधी तुझ्या या नातीला खरं खरं माफ कर ना. एकदा नेहमीसारखी घट्ट जवळ घे ना !'' पश्चात्तापाचे अश्रू ऋचाच्या गालावरून ओघळत होते. आजीचे डोळेही भरले होते न् हात नातीला जवळ घेण्यासाठी आसुसले होते.

* *

- कविता मेहेंदळे
६१२/१ सुखदा सोसायटी,
पुणे-सातारा रस्ता, पुणे 411037

पाचवी प्रवेश (२०१३-१४)

ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

(दिल्लीच्या केंद्रीय शिक्षण मंडळाशी संलग्न, पाचवी ते दहावी मिश्र माध्यमाची शाळा)

इयत्ता पाचवी प्रवेश चाचणी
रविवार, ३ मार्च २०१३

प्रवेश अर्ज : दि. १ ते २० फेब्रुवारी २०१३
स. ११ ते सायं. ६ पर्यंत उपलब्ध.

प्रवेश अर्जाची किंमत ₹ २५० (पोस्टाने ₹ २७५)

(मराठी/इंग्रजी माध्यमात शिक्षण घेत असलेले विद्यार्थी अर्ज करू शकतात)

प्रवेशअर्ज खालील संकेतस्थळावरही उपलब्ध
http://prashala.jnanaprabodhini.org

सोबत ₹ २५०/- चा डिमांड ड्राफ्ट पाठवावा.

फ त मर्यादित **मुलांसाठी** सहनिवासाची व्यवस्था

संपर्क : ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, ५१० सदाशिव पेठ, पुणे 411030, दूरभाष : ०२०-२४२०७ ०००/१२१

क्रीडाकुल

ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी
शास्त्रीय पद्धतीने
राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू घडविणारी शाळा.
क्रीडा, शिक्षण, मानस, आरोग्य, व्यवस्थापन असे पूरक विभाग

इयत्ता पाचवी प्रवेश चाचणी
शारीरिक, मानसिक व वैद्यकीय चाचणी.
१६ फेब्रुवारी ते २४ एप्रिल २०१३ या काळात
प्रत्येक शनिवारी सकाळी ७.०० वाजता

चाचणी शुल्क ₹ ३००/-

प्रवेश चाचणीकरता नावनोंदणी शनिवारपूर्वी करावी.

मर्यादित खेळाडूंसाठी सहनिवास व्यवस्था

संपर्क: ज्ञान प्रबोधिनी, क्रीडाकुल कार्यालय, निगडी, पुणे 411044
दूरभाष : ०२०-२७६५५२४९/२७६५४३८०

जरा ऐकून तर घ्या !!

(नाट्यछटा)

एकनाथ आव्हाड



‘‘अस्साऽ राग येतो ना या लोकांचा ! यांना आपण पदोपदी उपयोगी मात्र पडायचं अन् यांची बोलणीही खायची; कुणी सांगितलंय हे? मरू द्या. खरंतर मी सर्व रसांचा राजा. स्वयंपाकात माझं अढळ स्थान, पण कुण्णाला कौतुकही नाही. सारखं आपलं यांचं पालुपद सुरूच. भाजी झाली खारट अन् झाली आमटी खारट ! अरे, काय ‘प्रमाण’ वगैरे काही शिकलात की नाही? का भरली बुचकुली अन् टाकली भाजीत? अन् बोंब मात्र माझ्या नावाची, म्हणे मीठ झालं जास्त. हूँ ! मी नसू द्या, मग बघा कसा स्वयंपाकाचा सगळा बेरंग होऊन जातोय तो ! माझ्याशिवाय सगळे मसाले रडकुंडीला येतील, तेव्हा कळेल यांना.

आज मी अगदी ठरवलंय, कुण्णाला म्हणून घरात सापडायचं नाही. अगदी दडून बसणारे मी फडताळात. शोधा मग किती शोधताय ते. अहो, समुद्राच्या पाण्यापासून तयार झालो मी अन् यांच्यासाठी घराघरांत आलो. स्वयंपाकात उपयोगी पडतोय ते काय यांचे फुकटचे बोल ऐकून घ्यायला? नुसतं स्वयंपाकातच नाही तर यांच्या दातातील कीड बरी करण्यासाठी, चामडी कमविण्यासाठी मीच यांच्या मदतीला धावून जातो. माझे अनेक भाऊबंद आहेत; सैंधव (शेंदेलोण), पादेलोण, बोडलवण, सांबरलोण, दरयाई असे कितीतरी... यांच्याकडंच जाईन मी. कशाला या माणुसकीशुन्य माणसात राहू. माझा सैंधवभाऊ तर खाणीतून येतो. आणि या माणसांच्या कित्ती कित्ती उपयोगी पडतो. वात, पित्त, कफ या तीन दोषांपैकी जो दोष शरीरात वाढला असेल त्या दोषाला हा शांत करतो. पण प्रत्येक गोष्ट प्रमाणातच उपयोगी पडते, ही साधी गोष्ट ही माणसं का विसरून जातात? ‘अति खाणं आणि मसणात जाणं’ असंही ते एकाबाजूने म्हणतात अन् दुसऱ्या बाजूनं जीभेवर ताबा न ठेवता बका बका खात सुटतात. काय बोलायचं या लोकांना? औषधाचीसुद्धा मात्रा कमी अधिक झाली, तर ते औषध विष ठरू शकतं, हे कुणी सांगावं या झोपलेल्यांना ! यांच्या आहारात माझा वापर केलेले पदार्थच अधिक. मग सांगा, होईल की नाही यांच्या शरीरात आवश्यकतेपेक्षा माझे प्रमाण जास्त. मग ह्या अतिरि त प्रमाणामुळे पचन क्रिया, शरीरातील धातूंचे व वाताचे संतुलन बिघडणारच ! जठरातील दाह वाढणारच. सांधे दुखणं, डोकं दुखणं, मूत्ररोग यांसारखे विकाससुद्धा उद्‌भवणारच. पण मला सांगा यात माझा काय दोष. यांना आपलं सारखं चवीचवीनं खायचंय. त्याला मी तरी काय करू. ‘शरीराचंसुद्धा काही म्हणणं असत’, हे नको का या लोकांना समजायला?

मी यांना कित्ती कित्ती ठिकाणी उपयोगी पडतो म्हणून सांगू तुम्हाला. सकाळी-सकाळी गरम पाण्यात मीठ विरघळून ते पाणी प्याायलं की, उलटीवाटे पित्त व कफ पडून जातो यांचा. गरम पाण्यात मीठ घालून गुळण्या केल्याने घसा दुखणे, टॉन्सिल वाढणे, गळ्याला सूज येणे हे विकार चुटकीसरशी बरे होतात यांचे. पाण्यात मला घालून ते पाणी उकळून नंतर कोमट करून प्यायल्यानं विषमज्वर बरा होतो. ओवा व मीठ वाटून त्याचे चूर्ण घेतल्यानं पोटदुखी बंद होते. मीठ व हळद पाण्यात बारीक वाटून मुरगळल्याजागी लावल्यानं

✼ आदरांजली... माजी सरसंघचालक के. एस. सुदर्शन – १५ सप्टेंबर २०१२ ✼
प्रायोजक – डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, ग्लास्गो, स्कॉटलंड.

होणारी पीडा कमी होते. सरसूच्या तेलात मीठ कालवून ते मंजनाप्रमाणे दातावर चोळल्यास पायोरिया (दाताचा एक रोग) बरा होण्यास मदत होते. मधमाशीच्या दंशावर मीठ चोळल्यानं आराम पडतो. कोमट पाण्यात एक ते दीड चिमूट मीठ घालून रोज रात्री प्यायल्याने आतडी साफ होतात, मलावरोध दूर होतो व शौचशुद्धी होते. एक ना दोन माझे अनेक उपयोग. पण हे सर्व केव्हा? जेव्हा माझं सेवन योग्य प्रमाणात होईल तेव्हाच!

'खरे सार शोधोनिया नित्य घ्यावे
प्रमाणामध्ये सर्व काही असावे'

असं थोरांनी सांगून ठेवलंय ते उगीच नाही. दुर्गंधहारक व जंतुनाशक ही माझी खरीखुरी गुणवैशिष्ट्ये आहेत, हे आत्तापर्यंत तुम्ही ओळखलंच असेल.

झाली वाटतं माझी शोधाशोध परत सुरू. अडला ना

माझ्यामुळं सगळा स्वयंपाक? झाला ना खोळंबा? मग, म्हणूनच म्हणतोय दुसऱ्यांनाही महत्त्व द्यायला शिका अन् दुसऱ्यांचंही जरा ऐकून घेत जा!!'

* *

– एकनाथ आव्हाड
भाग्यवान को.हौ. सोसायटी, ए/२०२, खारदेवनगर,
एन्. जी. आचार्य मार्ग, चेंबूर, मुंबई 400071

करून तर पाहा...

झटपट आणि खमंग तीळगुळ लाडू



मित्रांनो, थंडी आता वाढू लागली आहे. सक्रांतही जवळ आली आहे. घरात गुळाच्या पोळ्या, तिळाचे लाडू, वड्यांची तयारी सुरू झाली असेल. तिळाचे पाकातले कडक लाडू व मऊ लाडू, वड्या असे अनेक प्रकार आहेत. त्यातील झटपट होणारे असे खमंग लाडू आज आपण शिकूया. ते तुम्हाला करायलाही अगदी सोप्पे !

साहित्य – भाजलेले तीळ १ वाटी, भाजलेले शेंगदाणे अर्धी वाटी, बारीक चिरलेला गूळ १ वाटी, स्वादासाठी थोडी जायफळाची पूड, थोडेसे साजूक तूप, सजावटीसाठी काजू.

कृती – प्रथम तीळ कढईत टाकून मंद आचेवर खरपूस भाजून घ्यावे. शेंगदाणे खरपूस भाजून घ्यावे. दाणे थंड झाल्यावर त्यांची सालं काढून घ्यावीत. नंतर दाण्याचं व तीळाचं कूट करून घ्यावं. आता एका वाडग्यात दाण्याचं कूट, तीळाचं कूट व चिरलेला गूळ छान एकत्र करावं त्यात जायफळाची थोडी पूड टाकावी. त्यामुळे लाडवाला छान वास येतो. मिश्रण थोडं कोरडं वाटल्यास त्यात थोडं साजूक तूप पातळ करून घालावं. नंतर त्याचे छोटे छोटे लाडू वळावे. शोभेसाठी त्यावर छोटा काजूचा तुकडा लावावा. शुभेच्छांबरोबर स्वत:च्या हातांनी तयार केलेले तीळगुळ लाडू मित्र-मैत्रिणींना/नातेवाईकांना देताना त्याची गोडी अधिकच वाढेल हो नं! मग चला लागा तयारीला...

– सुलभा कुलकर्णी
'अनंत' १३, भरतकुंज - २, एरंडवन, पुणे 411038



नांदवू जगी शांतता

तिरंग्याचे पाईक आम्ही
धाव आमुची पुढेपुढे
कर्तृत्वाची झेप घ्याया
गगन वाटे तोकडे ।।

नसानसात धैर्य खेळे
वज्रबाहू आमुचा
श ती यु ती सामर्थ्याने
वेध घेऊ शत्रूचा ।।

हातात हात घालूनी
सदा जपू बंधुत्व ते
एका सुरात नित्य गाऊ
देशभ तीची गीते ।।

राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज
राष्ट्रभ ती अंतरी
हाची देव, हीच गीता
नित्य जपू हृदयांतरी ।।

यत्न तोचि देव आम्हा
क्षण आमुचा नसे रिता
विज्ञानदृष्टी, ध्यास आता
व्हायचे जगी, महासत्ता ।।

जातीधर्मा पलीकडे
मनी वसे बंधूता
आण आम्हा मातीची या
नांदवू जगी शांतता ।।

– सचिन बेंडभर
पिंपळे जगताप, ता. शिरुर, जि. पुणे.

पाहिलेच पाहिजे असे काही...



फादर

प्रसाद नामजोशी

'आई' हा विषय तसा प्रत्येकाच्याच जिव्हाळ्याचा. तुमच्या आमच्या सामान्यांचा तो जेवढा आवडता विषय आहे तेवढाच कवी, लेखक आणि कलावंतांचाही ! आईची थोरवी सांगणाऱ्या कविता, कथा आणि चित्रपट यांची संख्या अक्षरश: मोजता न येण्यासारखीच. जर आई वेळप्रसंगी कर्तव्यकठोर होऊ शकते, तर मग वडिलांचं हृदय भावनेनं भरून आलं आणि वात्सल्यानं उचंबळून आलं, तर काय हरकत आहे? कर्तव्यकठोर पण सहृदय बापाची कहाणी सांगायला तेवढीच सहृदयता मात्र लागते. इराणचे प्रसिद्ध दिग्दर्शक माजिद माजिदी आणि मेहंदी शोजाई यांनी अशीच एका बापाची कथा लिहिली आहे. इ. स. १९६६ साली प्रदर्शित झालेला हा चित्रपट आहे –'फादर !'

नुकताच मिसरूड फुटू लागलेला 'मेहरूल्ला' आपल्याला चित्रपटाच्या सुरुवातीला दिसतो. वडिलांच्या निधनामुळे तो शहरात पैसे कमवण्यासाठी आलेला असतो. मिसरूडाबराबेरच त्याला स्वत:ची अशी मतंही फुटू लागण्याचं त्याचं ते वय. त्यामुळे तो जिथे खरेदी करतोय तिथेच त्याचं दुकानदाराशी भांडणही होतं. खूप प्रवास करून बऱ्याच दिवसांनी घरी जाताना त्यानं घरच्यांसाठी काही खरेदी केलेली आहे. त्याच्या खिशात त्याच्या वडिलांबरोबरचा एक फोटोही आहे.

घरी येतायेता त्याला लतीफ भेटतो. तो त्याला एक ध कादायक बातमी सांगतो. मधल्या काळात मेहरूल्लाच्या आईनं त्याच्या वडिलांच्या निधनानंतर एका पोलिसाशी दुसरं लग्न केल्याची ती बातमी आहे. या बातमीनं मेहरूल्ला चिडतो आणि लतीफलाच मारहाण करतो.

मग तो स्वत:च्या घरी जातो. तिथे आता सगळं ओसाड आहे. मग तो आईच्या नव्या घरी जातो. तिथे आईला, बहिणींना आणि आपल्या सावत्र वडिलांनाही बघतो. त्यांच्यासाठी आणलेल्या वस्तूंचं बोचकं फेकून देतो. बहिणीच्या आजारपणात सावत्र बापानंच पैसे खर्च केलेत हे कळल्यावर तो चिडतो. सावत्र बापाच्या अंगावर आपल्याजवळचे सगळे पैसे फेकतो आणि आपल्या बहिणी परत मागतो. बाप मोठा आहे. आडनिड्या वयाच्या मेहरूल्लाची प्रतिक्रिया त्याला समजू शकते. तो शांतपणे 'तू एक तर घरात ये नाही तर चालता हो,' असं मेहरूल्लाला बजावतो.

मेहरूल्ला मात्र आपल्या जुन्याच घरात राहाणं पसंत करतो. त्याच्या मनात बापाविषयी राग आहे. आपण घरात मोठे होतो. आईनं आपली वाट बघायला हवी होती. वडिलांच्या नंतर आपण घराची जबाबदारी घेतली असती, असं त्याला प्रामाणिकपणे वाटतं. या सगळ्याचा राग तो आपल्या सावत्र बापावर काढू बघतो. या ना त्या प्रकारानं त्याला त्रास द्यायचा मेहरूल्ला प्रयत्न करतो. हा बाप पोलिस आहे. मानवी भावनांचे उद्रेक त्याला नवे नाहीत. तो रोजच त्यातून जात असला पाहिजे. तो मेहरूल्लाचं सगळं वागणं शांतपणे बघतो.

मात्र एकदा त्याला त्याच्या भूमिकेतून बाहेर यावंच लागतं. त्याला कारणच तसं घडतं. मेहरूल्ला आजारी पडतो. त्याला तो घरात आणतो. त्याची आई बहिणी त्याची शुश्रूषा करतात. मेहरूल्लाला मात्र त्या आजारपणातही बापाचं घरात असणं सहन होत नाही. त्याच तिडकीनं तो आपल्या सावत्र बापाचं सर्विस रिवॉल्वर घेऊन पळून जातो. त्याच्या सोबत लतीफही आहेच.

आता मात्र बापाच्या सहनश तीचा अंत होतो. 'आता मी बाप नाही, नवरा नाही. अगदी माणूससुद्धा नाही,' असं तो मेहरूल्लाच्या आईला सांगतो आणि आपली मोटारसायकल घेऊन तिरीमिरीत बाहेर पडतो.

मेहरूल्ला हा मुळातच चौदा–पंधरा वर्षांचा अगदी

'होतकरू' म्हणावा असा 'गुन्हेगार'! त्याला पकडायला या मुळातच पोलिस असलेल्या बापाला असा कितीसा वेळ लागणार? दोघांनाही तो पकडतो. लतीफला परतीच्या गाडीत बसवतो आणि मेहरूल्लाला हातकडी घालून आपल्या मागे मोटारसायकलवर बसवतो आणि परतीच्या प्रवासाला निघतो.

इथून पुढे उरलेला चित्रपट हा त्या बापलेकांच्या परतीच्या प्रवासाचा आहे. सगळी वाळवंटातली भ्रमंती. भवताली रखरखतं वाळवंट आणि एकमेकांविषयी राग असणारे ते दोघं जीव. अत्यंत त्रासदायक असा तो प्रवास. वाटेत दोन-तीनदा ती मोटारसायकल बंद पडते. मेहरूल्ला मध्येच पळून जाण्याचाही प्रयत्न करतो. पण शेवटी कितीही झालं तरी ती उंदरामांजरांतली लढाई. प्रत्येकदा बापच सरस ठरतो. जवळचं पाणी संपलेलं. तहानेनं व्याकूळ झालेली ती दोघं एका विहिरीजवळ पोहोचतात पण तीही कोरडीच निघते.

बापाचा बांध फुटतो; 'हीसुद्धा कोरडीच आंहे' असं ओरडत तो मेहरूल्लाला मारत सुटतो. रखरखीत लँडस्केपवरचा तो बापाचा कोरडेपणा आणि मुलाचा कोडगेपणा अंगावर येतो. वाळूचं वादळ सुटतं. त्यापासून तो मुलाचं रक्षण करतो पण तेही आता अश य आहे. शेवटी तो मेहरूल्लाची हातकडी काढतो आणि त्याला जायला सांगतो. 'तू जा इथून आणि स्वत:चा जीव वाचव', असं अगतीक होऊन सांगणारा तो बाप बघून मेहरूल्लाच्या डोळ्यांत पाणी येतं.

संपूर्ण शुष्क अशा त्या वाळवंटात हृदयाचा ओलावा अजून उरलेला आहे हे कळतं. पण हृदयाच्या ओलव्यानं तहान भागत नसते, त्याला पाणीच लागतं. चौदा वर्षांच्या त्या मेहरूल्लालाही हे माहीत आहे. तो आता जीवाच्या आकांतानं पाण्याचा शोध घेऊ लागतो.

त्याला दोन-तीन उंट दिसतात. त्याच्या आजूबाजूला पाणी असणार म्हणून तो तिथे जातो. तिथे असलेल्या पाण्यात आपला शर्ट भिजवतो आणि बापाकडे आणतो. पण त्या पाण्यानं तो उठत नाही. शेवटी तो आपल्या बापाला त्या वाळूतून अक्षरश: ओढत पाण्यापाशी आणतो. दोघंही अर्धवट ग्लानीनं पाण्यात कोसळतात.

चित्रपटाला एक वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवणारं दृश्य आता सुरू होतं. या चित्रपटाच्या सुरुवातीला आपल्याला मेहरूल्लाच्या खिशात एक फोटो दिसतो. तो त्याचा आणि त्याच्या वडिलांचा आहे. पुढे आपल्या घरी जाताना त्याच्या खिशातून तो फोटो पाण्यात पडल्याचं दृश्यही दिसतं. मेहरूल्लाला घेऊन घराकडे परतणाऱ्या त्याच्या सावत्र बापाच्या खिशातही एक फोटो आहे. पण तो कुणाचा आहे हे मात्र दिसत नाही.

चित्रपटाच्या शेवटी जेव्हा अर्धवट ग्लानीत असलेले दोघेही त्या पाण्यात ओणवे पडतात तेव्हा बापाच्या खिशातला तो फोटोही पाण्यात पडतो. आणि प्रवाहात वाहात मेहरूल्लाच्या दिशेनं येतो. तो फोटो त्याच्या आईचा आणि बहिणींचा असतो. त्याच्या सावत्र बापानं 'आपलं' कुटुंब मानलेलं आहे, हे मेहरूल्लाच्या लक्षात येतं. रखरखीत वाळवंटातल्या वैराण प्रवासानंतर ग्लानी येऊन पाण्याच्या त्या इवल्याश्या प्रवाहात पडलेल्या दोघांमध्ये आता घट्ट बंध जुळलेला आहे. या कारूण्याच्या अलौकिक सौंदर्याचा प्रत्यय दिग्दर्शक आपल्याला देतो.

इराण फिल्म फेस्टिवल आणि आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिवलची त्या वर्षीची ७ पारितोषिके या चित्रपटाला मिळाली. 'महम्मद कसेबी' यांनी साकारलेली वडिलांची भूमिका आणि 'हसन सादेगी' यांचा मेहरूल्ला अप्रतिम. त्या वर्षांचं ज्युरिंतर्फे दिलं जाणारं उत्कृष्ट दिग्दर्शनाचं पारितोषिक 'माजिद माजिदींना' मिळालं. बापावरचा चित्रपट करण्यासाठी दिग्दर्शकही 'बाप' असावा लागतो हेच खरं !

✻ ✻

- प्रसाद नामजोशी

७, अदिती, डावी भुसारी कॉलनी, पौड रस्ता, पुणे - ३८

मुखपृष्ठ चित्रकार

नाव : ओंकार इनामदार

जन्म : २६/१० / १९८७

शैक्षणिक पात्रता : जी. डी. आर्टस्
(कलाविश्व महाविद्यालय, सांगली)

मला लहानपणापासून चित्रकला खूप आवडते. त्यातल्या जलरंग, पेस्टल रंग अशा विविध माध्यमांचा वापर करून मी चित्रे काढतो. मला लँडस्केप, पोर्ट्रेट अशा चित्रकलेच्या प्रकारात चित्र काढायला अधिक आवडते.

✻ **आदरांजली...** ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक व उत्तर प्रदेशचे राज्यपाल सत्यनारायण रेड्डी - ७ ऑ टोबर २०१२

सहभागी व्हा ! पुण्यामध्ये मुलींसाठी - क्रीडा दले, विज्ञान दल - द्वारा युवती विभाग-मेधाविनी ☎ ९४२३१६२१३४

लेखांक - १

क्रीडा आणि निर्णय कौशल्य

प्रा. आनंद लुंकड

स्वत:चे निर्णय स्वत: कसे घ्यायचे याबाबतचे काही लेख तुम्ही दिवाळी अंकात वाचले असतील. त्याच मालिकेतील पुढचे लेख क्रमश: 'छात्र प्रबोधन'च्या अंकातून 'निर्णयातील स्वावलंबन' या लेखमालेतून प्रकाशित होणार आहेत.

सांघिक वा वैयक्तिक कोणताही खेळ खेळत असताना पदोपदी आपल्याला छोटे-मोठे निर्णय घ्यावे लागतात. अगदी नाणेफेक जिंकल्यावर 'काय निर्णय घ्यायचा 'इथपासून ते आणीबाणीच्या प्रसंगावर मात करण्यासाठी एखादा धाडसी निर्णय घेण्यापर्यंत! कधी ते निर्णय स्वत:बद्दल तर कधी गटातल्या सदस्यांबद्दल असतात, कधी नियोजनपूर्वक घ्यावे लागतात तर कधी ऐन वेळी! कधी तात्पुरता निर्णय घ्यावा लागतो तर कधी व्यूहात्मक रचना ठरवताना; पण असे निर्णय घेताना शारीरिक क्षमता आणि कौशल्यांबरोबरच बुद्धीचा उत्तम उपयोग करावा लागतो . त्यातूनच खेळात अन् व्यवहारातही लागणाऱ्या निर्णयक्षमतेचा त्याला विकास व्हायला मदत होते.

स्वत:च्या अनुभवातून हे आपल्याला सांगताहेत राष्ट्रीय स्तराचे खो-खो पटू आणि सध्या प्रशिक्षक म्हणून काम करणारे प्रा. आनंद लुंकड ...

'जिल्हास्तरीय खो -खो स्पर्धेतील अंतिम सामना सुरू होता. आमच्या संघाने संरक्षण स्वीकारले. सामना सुरू होण्यास काही सेकंद बाकी. आमच्या कर्णधाराने नंतरच्या तीन जणांच्या गटात संरक्षण करण्यासाठी (पळतीसाठी) येणे अपेक्षित होते. अचानक त्याने पहिल्या तुकडीत संरक्षण करायला जाण्याचा निर्णय घेतला. त्याचा हा ऐनवेळचा निर्णय अफलातून यशस्वी ठरला. संघाने सामना जिंकला आणि पर्यायाने स्पर्धा देखील! ' अशा अनेक अनुभवांतून खेळ आणि त्यातील निर्णय यांचे नाते आपल्या समोर येते.

खो-खो च्या राज्यस्तरीय स्पर्धेतील उपान्त्य फेरीचा पुणे विरुद्ध उस्मानाबाद असा किशोर (१४ वर्षांखालील) गटाचा सामना सुरू होता. पुण्याच्या संघातील एका खेळाडूने सुरू असलेला एका संरक्षकाचा पाठलाग अचानक सोडला. सामन्याचे शेवटचे मिनिट चालू होते. शेवटच्या मिनिटात, 'अचानक आक्रमण करायचे नाही; तसेच दमलेल्या गड्याला विश्रांती मिळू द्यायची नाही,' अशी प्रशिक्षकांनी सर्व खेळाडूंना सूचना केलेली होती. मात्र त्या खेळाडूने प्रशिक्षकांची सूचना डावलून अचानक विरुद्ध दिशेच्या, लांब उभ्या असलेल्या मात्र गाफील अशा संरक्षकावर आक्रमण केले. पुण्याचा प्रशिक्षक, प्रेक्षक, पंच, मूळ संरक्षक या सर्वांनाच त्याच्या या कृतीचे आश्चर्य वाटले. मात्र, गाफील असलेला तो गडी त्या खेळाडूने टिपला. त्याचा हा निर्णय त्याक्षणी अतिशय योग्य ठरला.

वरील अनुभव पाहता त्याक्षणी त्या खेळाडूने घेतलेल्या निर्णयात अनेक घटकांचा समावेश आहे, असे मला वाटते. त्या खेळाडूची शारीरिक क्षमता, त्याचा सराव, बुद्धिमत्ता, त्या सामन्यादरम्यान त्याची चिंतेची पातळी, त्याचा मानसिक कणखरपणा व सरतेशेवटी त्याचा पूर्वानुभव या सर्व घटकांचे एकत्रित मिश्रण म्हणजे त्याने तो क्षणार्धात घेतलेला निर्णय होय. त्याचबरोबर प्रशिक्षकाचे कधी ऐकायचे व ऐनवेळच्या परिस्थितीनुसार प्रशिक्षकाच्या सूचना कधी बाजूला ठेवायच्या याचे भान, संघाचे अंतिम उद्दिष्ट काय याची स्पष्टता, पूर्वतयारी म्हणून त्याने केलेला अभ्यास

त्याच्या निर्णयात महत्त्वाचा ठरला. अर्थातच हा खेळाडू त्या वर्षी राष्ट्रीय स्पर्धेकरिता निवडला गेला.

खेळातील नियमांचे अचूक ज्ञान, आत्मविश्वास व सर्व बाजूंनी खेळाचे आकलन असेल, तर निर्णय घेताना आपण अधिक अचूक निर्णय घेऊ शकतो. याचा अनुभव मला खो-खोचा सामना खेळताना आला.

डिसेंबर-जानेवारी दरम्यान माझा जोरात अभ्यास सुरू होता. मला परीक्षेत उत्तम गुण मिळवायचे होते. त्यामुळे नोव्हेंबरपासून क्रीडासराव मी पूर्ण बंद केला होता. जानेवारीमध्ये मैदानावर स्पर्धा सुरू होत्या. एका संध्याकाळी मी आमच्या संघाचा सामना बघण्यास गेलो. आमच्या संघातील खेळाडू प्रतिस्पर्धी संघातील खेळाडूंपेक्षा लहान होते. अचानक तो सामना बघताना, आपल्या संघासाठी आपण आज खेळणे आवश्यक आहे असे मला तेव्हा वाटले. संघाची गरज, प्रतिस्पर्धी खेळाडूंचा खेळ व माझा अनुभव यांचा विचार करून मला संघात प्रवेश दिला गेला. माझे संरक्षण संघाला खूपच उपयोगी पडले. 'आपला संघ कमी पडत असताना मी स्वत: जर उपस्थित असेन तर मी काहीतरी कृतिपूर्ण मदत केली पाहिजे,' असा विचार तेव्हा मी केला. माझा त्या सामन्यात खेळाडू म्हणून खेळण्याचा निर्णय आमच्या संघाला जरी सामना जिंकून देऊ शकला नाही, तरी प्रेक्षक व प्रशिक्षकांनी माझ्या खेळाचे कौतुक केले. हा सामना मला मोठाच अनुभव देऊन गेला.

सांघिक खेळ खेळताना अनेक कृती एकत्र कराव्या लागतात. त्याचबरोबर चपळता, सजगता, निरीक्षणे, तल्लख बुद्धी, उत्साही मन आणि पूर्वानुभव या सर्वांचा विचार करून खेळाडूंना आपले निर्णय घ्यावे लागतात. काही निर्णय हे पूर्व नियोजित असतात तर काही निर्णय खेळाडूंना ऐनवेळी घ्यावे लागतात.

सांघिक खेळ खेळताना बऱ्याच वेळा खेळाडूंना खेळाबरोबरच बऱ्याच गोष्टींची निरीक्षणेही एकाच वेळी करावी लागतात. उदा. नेमका कोणता गडी कमकुवत आहे, कोणाचा पाठलाग करावा, पंचांनी दिलेला इशारा अथवा नियमोल्लंघन, ताकीद याचा अर्थ कसा लावायचा, प्रशिक्षकांची सूचना कशी पाळायची, सहकाऱ्यांशी संवाद कसा साधायचा इ. म्हणजेच या

काव्यार्थाचे जग हे सुंदर, सुखदु:खाचे घडते मंदिर। शब्द सूरांचे मिटता अंतर, आशयामधे फुलते अंबर।।

✲ आदरांजली... ज्येष्ठ लेखक व साहित्य अकादमीचे अध्यक्ष सुनील गंगोपाध्याय - २३ ऑक्टोबर २०१२✲
सहभागी व्हा, अनुभव घ्या - सुट्टीमधील जोडीकार्ये - द्वारा छात्र प्रबोधन ☎ २४२०७१७४

सर्व गोष्टींचा विचार एकीकडे करायचा असतो, तर दुसरीकडे शारीरिक हालचालही चालू ठेवायची असते. निर्णायक क्षणी खेळाडूला निर्णय घेण्यासाठी निरीक्षणांचा न कीच उपयोग होतो.

स्पर्धेच्या स्तराप्रमाणे देखील खेळाडूना काही निर्णय घ्यावे लागतात. उदा. जिल्हा स्तरीय स्पर्धेत निर्णयाचे बरेचसे स्वातंत्र्य खेळाडूंना असते. मात्र अटीतटीच्या सामन्यात (कोणत्याही स्तरावर) निर्णय हे जरा जपूनच घ्यावे लागतात. राज्य, राष्ट्रीय वआंतरराष्ट्रीय स्तरावर खेळताना घेतले जाणारे निर्णय नियोजनबद्ध असावे लागतात. त्यासाठी मात्र खूपच सराव आणि अनुभव गाठीशी असावा लागतो. जसाजसा स्तर वाढतो तशी तशी त्या निर्णयाची जबाबदारीदेखील वाढते. याचाच परिणाम म्हणून राष्ट्रीय स्तरावरच्या स्पर्धेत सर्वात अनुभवी खेळाडूला कर्णधार निवडतात. स्पर्धास्तराप्रमाणेच वयोगटानुसार देखील निर्णय घेतले जातात. किशोर गटातील खेळाडू बऱ्याच वेळा प्रशिक्षकांकडे बघून अथवा त्यांच्या सूचनेप्रमाणे निर्णय घेतात. मात्र कुमार गट व खुला गट यातील खेळाडूंना निर्णयाचे बरेचसे स्वातंत्र्य दिले जाते. असे असले तरी आपले सहकारी व सामन्यासाठीचे केलेले नियोजन या आधारावरच निर्णय घेतले जातात.

आज विचार करताना, खेळाडू असताना घेतलेले निर्णय योग्य की अयोग्य या पेक्षा ते 'कसे' घेतले गेले हे

पाहाणे कालांतराने मजेचे ठरते. तेव्हा घेतलेले निर्णय आता प्रशिक्षक असताना उपयोगाचे ठरतात. अर्थात माझ्या संघातील खेळाडूंना असे स्वतंत्र निर्णय घेण्यास उद्यु त करणे मला गरजेचे वाटते. तशी संधी मी त्यांना देतो. शेवटी असे वाटते की खेळाडूंना, त्यातही सांघिक खेळातील खेळाडूंना असे स्वतंत्र निर्णय घ्यावेच लागतात. व्यवस्थापन कौशल्यातील कोणत्याही वर्ग/ प्रशिक्षणाशिवाय हे शिकायला मिळते. म्हणूनच मला माझा खेळ खो-खो खूपच निर्णायक वाटतो.

* *

प्रा. आनंद लुंकड

(खो-खो चे राष्ट्रीय खेळाडू, क्रीडा शिक्षण शास्त्रात संशोधन चालू. ज्ञान प्रबोधिनी क्रीडाकुल, निगडी येथे प्रशिक्षक)

खेळातील काही निर्णायक क्षण...

* फुटबॉल विश्वचषक २००२ अंतिम सामना. ब्राझील विरुद्ध जर्मनी. ब्राझीलचा कप्तान 'काका' या खेळाडूने गोलक्षेत्रामध्ये धडक मारली. मात्र ऐनवेळी त्याने त्याच्या शेजारच्या अनुभवी खेळाडूला रिवाल्डोला पास दिला. मात्र रिवाल्डोने तो पास न घेता स्वत:च्या दोन पायांमधून बॉल मागे जाऊ दिला. रिवाल्डोच्या मागे असलेल्या रोनाल्डोने तो गोल केला. ही सर्व कृती क्षणार्धात घडली. कर्णधाराने पास देताना फ त रिवाल्डोचा विचार केला. कारण रिवाल्डोला आपल्यापेक्षा अधिक संधी आहे, असे कर्णधाराला वाटले. मात्र रिवाल्डोने देखील हाच विचार करून तो चेंडू रोनाल्डोसाठी सोडला, रिवाल्डोचा हा निर्णय अफलातून ठरला.
* क्रिकेट विश्वचषक २०११ च्या अंतिम सामन्यात कर्णधार महेंद्रसिंग धोनीने फलंदाजीचा क्रम बदलून स्वत: पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला आला आणि सामना व विश्वचषक जिंकला. या सर्व कृतींच्या वेळेचे निर्णय अफाट होते. या निर्णयामुळे संपूर्ण जगाला त्यांचा आत्मविश्वास कळला.

‘शुभ प्रभात!’

मुकुंदराज कुलकर्णी

रात्रीचा घनदाट अंधार हळूहळू विरळ होऊ लागतो तसा पूर्वेला रंगांचा कल्लोळ उसळतो. यथावकाश प्राचीच्या भाळावर र तिम मंगल तिलक उमटतो. अवघा परिसर प्रसन्न तेजाने उजळून निघतो. कोवळा तांबूस सूर्यनारायण, झगमगत्या सोनसळी किरणांचे वत्सल हात धरतीच्या मुखावरून हळुवारपणे फिरवू लागतो तेव्हा वातावरणात एक मंगल ध्वनी निनादत असतो, ... ‘शुभ प्रभात’.

निरपेक्ष शुभेच्छा देणाऱ्या सूर्यदेवासारखी काही अपवादात्मक माणसंदेखील असतात. भारतीय वायुसेनेतून सेवानिवृत्त झालेले माझे एक ज्येष्ठ स्नेही आहेत. रोज प्रभात फेरीच्यावेळी मैदानावर त्यांची माझी भेट होते. नेहमी हसतमुख असणाऱ्या या व्य ती चा मित्रपरिवार फार मोठा आहे. मैदानावरील ज्येष्ठ व्य तीला लष्करी पद्धतीने सॅल्युट करणे व प्रत्येक लहानमुलाशी प्रेमाने हस्तांदोलन करणे हा त्यांचा नित्य उपक्रम, रोजच उत्साहात चालू असतो. ते एकदा मला म्हणाले की, ‘समोरच्या व्य तीने आपल्याला नमस्कार करण्याआधी, आपण त्याला नमस्कार करावयाचा असा माझा नियम आहे.’ माणसामाणसातील अहंकारांच्या भिंती हिमालयाहून मोठ्या होत असताना आणि त्यामुळे माणसं स्वत:च्या अहंकाराच्या कोषात एकेकटी धुमसत असताना, भेटणाऱ्या प्रत्येकाशी आपुलकीचं, स्नेहाचं नातं जोडण्यासाठी मनापासून पुढाकार घेणारी ही व्य ती मला नेहमीच वंदनीय वाटते. या व्य तीच्या हसऱ्या डोळ्यांत तीच अक्षरे चमचमत असतात... ‘शुभ प्रभात’.

माझ्या नात्यातील एक गृहस्थ आहेत. ‘देवमाणूस’ हा शब्दसुद्धा अपुरा पडेल एवढं तिचं भलेपणाचं क्षितिज अथांग आहे. बँकेतून स्वेच्छानिवृत्ती घेतलेली ही व्य ती, मित्र, नातेवाईक, परिचित यांच्या मदतीसाठी सदैव तत्पर असते. त्यासाठी शारीरिक व प्रसंगी आर्थिक झळही सोसते आणि एवढं करूनही त्याचा कुठंही उच्चार



✻ आदरांजली... शिवसेनाप्रमुख व ज्येष्ठ व्यंगचित्रकार बाळासाहेब ठाकरे – १७ नोव्हेंबर २०१२ ✻
पाचवी ते नववीसाठी मानसपट मापन - द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका ☎ २४२०७१४५

नसतो. स्वत:च्या व्य तिगत आयुष्यातील आभाळदु:ख बाजूला ठेवून, सहवासातील प्रत्येकाला मनमुराद हसवणारी ही व्य ती! इतरांच्या कल्याणासाठी अहोरात्र व्यग्र असते. तेव्हा जणू आपल्या प्रत्येक कृतीतून ती म्हणत असते, ...'शुभ प्रभात'.

माझे एक जवळचे स्नेही आहेत. प्रापंचिक पण संन्याशालाही लाजवेल अशी त्यांची विर त वृत्ती! मुळातले विद्युत मंडळातील अभियंता पण स्वेच्छा निवृत्तीनंतर पूर्णवेळ ध्यान, जप, अनुष्ठाने यात सतत व्यस्त असतात. या व्य तिगत साधनेबरोबरच ज्योतिषशास्त्राचे व 'बाराक्षार' औषधांचे मार्गदर्शन करून, तळागाळातील लोकांचे समस्या निवारण करण्यासाठी त्यांचा बराच वेळ जातो. हे सारं अर्थातच पूर्णपणे विनाशुल्क चालू असतं. स्वत:च्या मालकीची राहती जागा त्यांनी एका आश्रमाला दान दिलीय. छोट्या जागेत तिथेच ते पुजारी म्हणून राहतात. लाखो रुपये किंमतीची शेतजमीन त्यांनी भावांच्या नावावर करून दिली आहे. 'स्थावर काहीच नावावर नसल्यामुळे मला खूप छान मोकळं वाटतंय', असं जेव्हा मला ते आनंदाने म्हणाले तेव्हा मी त्यांच्यासमोर मनोमन नतमस्तक झालो. आस तीनं लडबडलेली, शेवाळलेली डबकी सर्वदूर दिसत असताना, जेव्हा असा एखादा निरास त, स्वच्छ पाण्याचा झुळझुळता झरा भेटतो तेव्हा त्याच्या झुळझुळण्यातूनही तेच संगीत स्पष्ट ऐकू येतं...'शुभ-प्रभात'.

सतत ऊर्जा देणाऱ्या सूर्यासारखी, नुसत्या शब्दांनी नव्हे, तर कृतीतून शुभेच्छा देणारी आपल्याला ज्ञात अज्ञात अशी कितीतरी माणसं ! त्यांच्यामुळेच आपला जीवनरथ निर्वेधपणे चालू असतो. याची कृतज्ञ जाणीव आपल्या मनात सदैव असली पाहिजे. आपल्याही छोट्या छोट्या कृतीतून अशा हार्दिक निरपेक्ष शुभेच्छा व्य त होणे आवश्यक असते. निदान तसा संकल्प या संक्रांतीच्या निमित्ताने करूया...

अशा वैचारिक संक्रमणाच्या दिशेने एक पाऊल उचलण्यासाठी 'शुभ-प्रभात'.

'मशाल व्हावी आयुष्याची '
लोक जाणते सांगत आले
ज्यांची निधडी छाती त्यांनी
जळताजळता क्षितिज उजळविले ।
मशाल होणे जमले नाही ।
निदान आपण पणती व्हावे
भार ज्योतीचा पेलत माथा ।
वातीसम नतमस्तक व्हावे ।

* *

मुकुंदराज कुलकर्णी
'श्रीराम', पाटील प्लॉट,
शिवाजीनगर, बार्शी 416013

मलपृष्ठ प्रकाशचित्रांविषयी...

अद्‌भुत निसर्ग वैभव !!

मुख्य प्रकाशचित्र हे मिझोराम राज्यातील 'आयझॉल' या राजधानीच्या शहरापासून 'रियाळ' या पर्वतशिखराकडे जाताना मधल्या टप्प्यावर सुमारे ४,५०० फूट उंचीवर सकाळच्या वेळी टिपले आहे. दरीवर पसरलेली ढगांची दुलई फारच मोहक दिसत होती. जवळचे झाड प्रकाशचित्रात मध्यभागी न घेता कडेला घेतल्यामुळे त्या चित्राची कलात्मकता अजून वाढली आहे.

दुसरे छोटे चित्र आहे ते सज्जनगड-ठोसेघर रस्त्यावरचे! जमिनीवर पडलेले मोठे इंद्रधनुष्य! वेळ दुपारची! ऊन-पावसाचा खेळ चालू असतानाची!! कोडं पडावं असं हे दृश्य! या चित्राचं सौंदर्य अनुभवतानाच यामागचं विज्ञान उलगडून सांगता येईल का? प्रयत्न करून बघा बरं... आणि कळवा आम्हाला... !

निसर्ग खरोखरीच थ क करून सोडणारी दृश्यं आपल्यासमोर उधळत असतो. आपल्याला अशा काही दृश्यांचे साक्षीदार होता येणं, हे आपलं भाग्य! माझ्या भाग्यातले हे काही क्षण मला 'कॅमेऱ्यात'ही टिपता आले याचा विशेष आनंद वाटतो. तुम्हालाही असे काही विलक्षण क्षण पाहण्याची अन् ते कॅमेऱ्यात टिपण्याची संधी मिळाली, तर ती प्रकाशचित्रे 'छात्र प्रबोधन'कडे जरूर पाठवा. पण त्यासाठी मु तपणे निसर्गात हिंडायला, नुसत्या डोळ्यांनीही या निसर्गातील वैभवाचा आस्वाद घ्यायला विसरू नका, बरं का!

– महेन्द्र सेठिया

दहावी-बारावीसाठी - अभिक्षमता मापन व व्यवसाय मार्गदर्शन- द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका ☎ २४२०७१४४

प्रिय देवा,

त्या दिवशी मी खरंच चुकले; पण त्या पैशांनी मी काही वाईट केलं का? मी चूक केली हे खरंच, पण त्याचे प्रायश्चित्तही मी घेतले. तरीही तू माझ्यावर रागवला आहेस का देवा?

त्या दिवशी गणिताच्या रटाळ, कंटाळवाण्या तासाला सूचना आली की, आमच्या वर्गाची सहल 'राजगडा'वर जाणार आहे. पुढच्या आठवड्यात प्रवेश शुल्क द्यायचे होते. सहल तशी दोन आठवड्यानंतर होती; पण पैसे मात्र दोन दिवसांत जमा करायचे होते.

तसं आईला गळ घालून ५० रुपये मिळवणं फारसं कठीण नव्हतं. पण मी मागच्याच आठवड्यात १०० रुपये हरवले होते त्यामुळे मागायला भीती वाटत होती. खरंतर माझा विश्वासच बसत नाही की, मी तेव्हा असं कसं वागले...! आता मला माझीच लाज वाटतेय. पण मग मी करणार तरी काय होते? पैसे तर दोन दिवसात भरायचे होते आणि घरी मागायची हिंमत तर होत नव्हती; म्हणून बाबा झोपले असताना मी त्यांच्या पाकीटातून पैसे चोरले ! रात्रभर झोप लागली नाही मला.

पण कसे काय देव जाणे, दुसऱ्या दिवशी बाईंना पैसे द्यायला गेले पण तोंडातून शब्दच फुटला नाही; तशीच परत वर्गात आले. त्या दिवशी मधली सुट्टी होईपर्यंत एक गोष्ट मला जाणवत होती की स्नेहा खूपच गप्प गप्प, उदास आहे. मधल्या सुट्टीत मी तिला विचारल्यावर ती म्हणाली की, अलीकडे तिच्या बाबांना व्यवसायात खूपच मोठं नुकसान सोसावं लागलंय. त्यामुळे ते चिडचिडे झाले आहेत. ५० रुपये ही काही मोठी र कम नव्हती; पण या परिस्थितीत त्यांना काही 'मागणे' स्नेहाला योग्य वाटत नव्हते. त्यामुळे तीने सहलीला न येण्याचा निर्णय घेतला. शाळा सुटताना मी ते पैसे हळूच स्नेहाच्या दप्तरात टाकले कारण स्नेहानं सहलीला यावं असं मला मनापासून, वाटत होतं. दिवसभर मी खूप बैचैन होते.

घरी गेल्यावर आई-बाबांनाही मी सगळं खरंखरं सांगून टाकलं. माझ्या मनावरचा ताण एकदम हलका झाल्यासारखं वाटलं. आई-बाबांनी मी केलेली चूक विशेष मनावर घेतली नाही. मला स्वत:लाच माझी चूक उमजली हेच त्यांच्यादृष्टीनं पुरेसं होतं. पण आता आई-बाबा स्वत: सहलीला 'जा' म्हणतात तरी मी सहलीला 'नाही' जाणार. मी चूक केली तर त्याची शिक्षाही मलाच भोगली पाहिजे.

देवा, जशी मी केलेली चूक अशा प्रकारे सुधारायची तू मला सुबुद्धी दिलीस तशी ती सर्वांना दे !

तुझीच,
आसावरी

ता. क. - एवढे प्रेमळ आई-बाबा दिल्याबद्दल तुझे खूप आभार...!

कु. आसावरी थिटे (इ. ७ वी)
ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

✲ आदरांजली... जगातील सर्वात वयस्कर व्य ती (११६) श्रीमती बेसी कुपर - जॉर्जिया - ४ डिसेंबर २०१२
सातवी ते नववीच्या मुलामुलींसाठी - सामूहिक विद्याव्रत संस्कार -द्वारा संवादिनी ☎ २४२०७२२२

मारुती चितमपल्ली यांनी महाराष्ट्र शासनाच्या वन विभागात अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. वन्य प्राणी व त्यांचे सहजीवन यावर मारुती चितमपल्ली यांची बरीच पुस्तकेही प्रसिद्ध आहेत. त्यातलेच 'नवेगावबांधचे दिवस' हे पुस्तक आहे. चितमपल्ली नवेगाव बांध येथे राहात होते त्यावेळची त्यांची पक्ष्यांविषयीची निरीक्षणे त्या पुस्तकात आहेत.

वाचलेच पाहिजे असे काही...



नवेगावबांधचे दिवस

नवेगावबांध हे भंडारा जिल्ह्यातले पक्ष्यांसाठी असलेले राष्ट्रीय उद्यान आहे. दरवर्षी येथे जवळ जवळ ५०० वेगवेगळ्या जातींचे पक्षी स्थलांतरित होतात. यामध्ये सैबेरिया, तिबेट, मानससरोवर, खैबरखिंड अशा अनेक भागातून पक्षी येतात व काही काळ राहतात.

या पुस्तकात त्यांनी पक्ष्यांचे सहजीवन, पक्ष्यांची कुटुंबपद्धती, त्यांचे जीवन यांविषयी लिहिले आहे. हे पुस्तक सहज सोप्या ओघवत्या भाषेत लिहिलेले असून पक्षी निरीक्षण करणाऱ्यांच्या तसेच निसर्गप्रेमींच्या संग्रही असावे असेच ते आहे. निसर्गप्रेमींसाठी अतिशय महत्त्वाच्या आणि जाणीवपूर्वक ज्यांचे पालन करावे, अशा सूचनाही यात आहेत. जंगलात फिरताना जंगलाचे नियम; तेथे घ्यावी लागणारी खबरदारी, जेणेकरून तेथील जिवांना मु तपणे, स्वच्छंदपणे जंगलात वावरता येईल इ. बाबींची माहिती या पुस्तकात दिली आहे.

या पुस्तकात लेखकाने केलेली काही निरीक्षणे आपल्याला न कीच थ क करतात. उदा. 'गोरनाची' या प्रकरणात ('नाची' याचा अर्थ नर) लेखकाची चिकाटी दाद देण्याजोगी आहे. पावसामुळे जीवाला असणारा धोका पत्करून रात्रभर मचाणावर बसून काढल्यानंतर सकाळी शंभराच्यावर मोर व लांडोरी यांच्या थव्याचे नृत्य लेखकाला बघायला मिळाले. हे नृत्य बघून लेखक म्हणतात, 'या पिसाऱ्याचे वर्णन करायचे म्हणजे जणुकाही एखादे संवेदनशील वादकाच्या वादनातून वेगवेगळ्या लहरींमधून निर्माण होणारा कोमल झंकार होय!

असेच त्यांनी केलेले एक वेगळे निरीक्षण होते, ते वणकी जातीच्या बदकांचे ! वणकी जातीची रानबदके लाकडी फळकुटांपासून बनविलेल्या पेट्यांच्या घरात आधी जरा साशंक होऊन राहातात. पण ४-५ दिवस बदकांनी केलेल्या निरीक्षणानंतर या पेटीच्याच घरात बदकांनी तयार केलेल्या खोप्याचे निरीक्षण करताना लेखकाला येणाऱ्या अडचणी व त्यावर मात करत मिळालेला आनंद अवर्णनीय आहे. त्या बदकांचे केलेले निरीक्षण जेव्हा चितमपल्लींनी प्रसिद्ध पक्षी अभ्यासक धर्मकुमारसिंह व डॉ. सलिम अली यांना कळविले तेव्हा या दोघांचाही या निरीक्षणांवर सुरुवातीला विश्वास बसला नाही. लाकडी पेटीत तयार केलेली ही घरटी त्या दोघांनीही तिथे प्रत्यक्ष येऊन बघितली.

नवेगावबांधची निर्मिती चिमण पाटील व त्यांचे बंधू कोळू पाटील यांनी केलेली आहे. या संपूर्ण कुटुंबाविषयीची माहितीदेखील या पुस्तकात आहे. माधवराव पाटील हे लेखकांचे अतिशय जवळचे स्नेही होते. त्यांच्यामुळे हा सर्व परिसर त्यांना चांगला न्याहाळता आला. चितमपल्लींच्या शब्दात सांगायचे तर, 'माधवराव पाटलांकडे कधीही न संपणारा ज्ञानाचा खजिना आहे. या सोबत्याने मला भरभरून दिले; पण माझीच झोळी अपुरी पडली.'

या जंगलाचे महत्त्व आपण सर्वांनी ओळखले नाही तर रखरखीत वाळवंटाचे आपण सर्व प्रवासी होऊ, असा इशारा जणुकाही लेखकाने आपल्या सगळ्यांना या पुस्तकाद्वारा दिला असावा.

पुस्तकाचे नाव : नवेगावबांधचे दिवस
लेखक : मारुती चितमपल्ली
प्रकाशक : साहित्य प्रसार केंद्र, नागपूर
पृष्ठसंख्या : २३२ किंमत : ₹ २००/-

* *

कु. अपूर्वा फडणीस
डी-२, भार्गव अपार्ट., आकाशवाणी केंद्राजवळ, नाशिक

पिंपळीच्या झाडावर येऊन घार बसली । अलगद कौलारावर तशी सांज उतरली ।।

* आदरांजली... आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ज्येष्ठ सतारवादक श्री. रवीशंकर - १२ डिसेंबर २०१२ *
UPSC, परिक्षा पूर्वतयारी वर्ग - द्वारा स्पर्धा परीक्षा केंद्र ☎ २४२०७१३४

खरं सांगायचं तर आता आठवतही नाही की, मी कधीपासून 'छात्र प्रबोधन' वाचतोय. कदाचित तिसरी-चौथीमध्ये होतो तेव्हा पहिलं मासिक बाबांनी आणलं असावं. तेव्हापासून आज महाविद्यालयात (द्वितीय वर्ष) आलो, तरी 'छात्र प्रबोधन' वाचायची सवय किंवा 'आवड' अजूनही तशीच आहे. किंबहुना ती अधिक 'मुरलीय', असं म्हणायला हरकत नाही. सुरुवातीला अंकातल्या कथा, विनोद, कोडी हेच आवर्जून वाचायचो; पण जसजसे पुढच्या इयत्तेत जाऊ लागलो तसे तसे अंकातील वेगवेगळे माहितीपर लेख, वेगवेगळ्या विषयांवरील लेखमाला विशेष आवडू लागले.

दरवेळी काहीतरी नवीन, भारी वाचायला मिळणार हे तर माहीत असतंच; पण घरी आल्यावर टेबलावर तो अंक दिसला की बूट काढण्याआधी अंकाचं मुखपृष्ठ लक्षात राहातं. दिवाळी अंकाचं आकर्षण तर वेगळंच ! त्यातील भेट खरोखरीच अनोखी... आजही दोन गोष्टी तशाच आहेत; मासिक वाचण्याची ती उत्सुकता आणि 'हा अंक अजून मोठा' (३२ पानांपेक्षाही अधिक पानी...) का नसतो?' हा प्रश्न !

'छात्र प्रबोधन'ला माझ्या भरभरून शुभेच्छा !

– स्वानंद जोशी

माझ्या नजरेतून 'छात्र प्रबोधन'

छात्र प्रबोधन २० वर्षांची वाटचाल

प्रबोधिनीत आल्यापासून 'छात्र प्रबोधन' वाचायला लागले ते थेट आजपर्यंत! गेली साधारण दहा वर्षे 'छात्र प्रबोधन' वाचते आहे. हे फ त 'मासिक नसून चळवळ आहे' असं कुणी आवर्जून सांगितलं नसलं तरी इ. ५ वी पासूनच 'छात्र प्रबोधन' हे मासिकापेक्षा खूप जास्त आहे, असं जाणवत होतं. मग हळूहळू 'छात्र प्रबोधन'च्या इतर उपक्रमातून 'छात्र प्रबोधन'चे संघटनेचे काम, विस्तार केंद्र, अनेकविध उपक्रम या सर्वांतून 'छात्र प्रबोधन'ची मनात असलेली चळवळ ही प्रतिमा ठळक झाली. दिवाळी अंकाची नोंदणी करण्यासाठी घरोघरी फिरण्यातली मजा असो किंवा तपपूर्ती मेळाव्यातील कुमार मेळाव्याचा अनुभव असो, विस्तार शिबिरे असो किंवा नंतरच्या काळातील 'छात्र प्रबोधन'च्या एका अंकाचे संपादन करण्याचा, वेळोवेळी 'छात्र प्रबोधन'साठी लेख लिहिण्याचा प्रयत्न असो; 'छात्र प्रबोधन'ने अनुभवाच्या पातळीवर मला नेहमीच 'समृद्ध' केलं आहे. पुढील अनेक वर्षे 'छात्र प्रबोधन' नवनवीन साहित्य व उपक्रम घेऊन वाचकांच्या भेटीला येत राहो, ही सदिच्छा!

– अदिती पटवर्धन

कुमारांसाठी निबंध स्पर्धा - 'अभ्यास देश परिस्थितीचा...'

आपल्या देशात घडणाऱ्या कोणत्याही महत्त्वाच्या घटनेविषयी आपण त्या-त्या वेळी ओझरती माहिती करून घेत असतो. या स्पर्धेच्या निमित्ताने तुम्ही गेल्या वर्षभरात, **राजकीय/सामाजिक/आर्थिक/विज्ञान-तंत्रज्ञान/पर्यावरण** यांपैकी कुठल्याही एका क्षेत्रात घडून गेलेल्या ३ ते ५ घटनांविषयी सखोल अभ्यास करा. अशा घटनांचा तपशीलवार अभ्यास, त्याचे महत्त्व, त्याचे संभाव्य परिणाम, त्यावरील तुमचे भाष्य-मते **'छात्र प्रबोधन'कडे सुमारे ५०० ते ६०० शब्दांपर्यंत** लिहून पाठवा. **निबंध पाठवण्याची अंतिम तारीख – २८ फेब्रुवारी २०१३.**

पारितोषिके – प्रथम ₹ २५०, द्वितीय ₹ १५०, तृतीय ₹ १००

तुमच्या अभ्यासासाठी वर्तमानपत्रे, नियतकालिके यांमधून प्रकाशित झालेले लेख, विविध टीव्ही चॅनेलवर दाखवण्यात येणाऱ्या वार्षिक आढाव्याचा संदर्भ तुम्ही निबंध लिहिताना जरूर घ्यावा. निबंधाच्या शेवटी संदर्भ सूची जरूर लिहावी.

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी
राष्ट्रीय सौर ११ पौष, शके १९३४, १ जानेवारी २०१३ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे-२ येथे छापून,
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.

भुवन मण्डले

भुवन मण्डले नवयुगमुदयतु सदा विवेकानन्दमयम् ।
सुविवेकमयं स्वानन्दमयम् ।। धृ ।।

तमोमयं जनजीवनमधुना निष्क्रियताऽऽलस्यग्रस्तम ।
रजोमयमिदं किंवा बहुधा क्रोध-लोभ-मोहाभिहतम् ।
भ ति-ज्ञान-कर्म-विज्ञानैः भवतु सात्विकोद्योतमयम् ।। १ ।।

वन्हिवायुजल-बल-विवर्धकं पात्र्चभौतिकं विज्ञानम् ।
सलिलनिधितलं गगनमण्डलं करतल-फलमिव कुर्वाणम् ।
दिक्षु विकीर्णं मनुजकुलमिदं घटयतुचैक-कुटुम्बमयम् ।। २ ।।

सगुणाकारं अगुणाकारं एकाकारमनेकाकारम् ।
भजन्ति एते भजन्तु देवं स्वस्व-निष्ठ्या विमत्सरम् ।
विश्वधर्ममिममुदारभावं प्रवर्धयतु सौहार्दमयम् ।। ३ ।।

जीवे जीवे शिवः स्वरूपं सदा भावयतु सेवायाम् ।
श्रीमदूर्जितं महामानवं समर्चयतु निज-पूजायाम् ।
चरतु मानवोऽयं सुहितकरं धर्मं सेवा त्यागमयम् ।। ४ ।।

(अर्थ आतील पानावर)

स्वामी विवेकानंद
शतकोत्तर सुवर्णजयंतीनिमित्त
त्यांच्या विचारांवर आधारित
गीतमाला -११

स्वामी विवेकानंदांचे विचार आचरणात आणूया !...११

परिपूर्ण प्रामाणिकपणा, शुचिर्भूतता, उत्तुंग प्रज्ञा अदम्य इच्छाश ती घेऊन मोजकी माणसे कामास लागोत, ती सारे विश्व इकडचे तिकडे करून टाकतील !

- माझ्याकडून चूक झाल्यास निर्भयपणे ती चूक मी मान्य करीन आणि मनापासून सुधारण्याचा प्रयत्न करीन.
- माझे ध्येय कितीही अवघड असले तरी ते गाठण्याचा मी चिकाटीने व जिद्दीने प्रयत्न करीन.

ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सवानिमित्त
कार्य - प्रात्यक्षिके - २७ जानेवारी २०१३ - सस्नेह निमंत्रण

दरवर्षी स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त युवक-युवती विभागांतर्फे क्रीडा-प्रात्यक्षिकांचे आयोजन केले जाते. यंदा ज्ञान प्रबोधिनी सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त रविवार, **दि. २७ जानेवारी २०१३** रोजी प्रबोधिनीची शिक्षण, संघटन, संशोधन, ग्राम विकसन, राष्ट्रीय एकात्मता, स्त्री श ती प्रबोधन अशा विविध दिशांनी चालणारी 'मनुष्यघडणीची प्रक्रिया' कार्य-प्रात्यक्षिकांद्वारे सर्वांपर्यंत पोहोचवण्याचा मानस आहे. आपण सर्वांनी आवर्जून ही प्रात्यक्षिके पाहायला उपस्थित राहावे. जागा, वेळ व अन्य तपशीलासाठी ५ जानेवारीनंतर 'ज्ञान प्रबोधिनी' मध्ये संपर्क करावा !

संपर्क व्य ती - मेधाविनी वाटवे - ९४२३१६२१३४

॥ राष्ट्रदेवाः भवेम ॥
५०
ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सव

सौर पौष, शके १९३४/जानेवारी २०१३, पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
पंजीकरण क्रमांक (RNI NO.)MAHMAR/2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (PHM/SR/201/VIII/2001)
L-2 / RNP / PNW/M / 94 / 2012 - 2014, **Posted at S.P. Post Office On 1st of Every Month.**

सौर दिनदर्शिका
शके १९३४

	जानेवारी २०१३	पौष माघ
मं.	1	११
बु.	2	१२
गु.	3	१३
शु.	4	१४
श.	5	१५
र.	6	१६
सो.	7	१७
मं.	8	१८
बु.	9	१९
गु.	10	२०
शु.	11	२१
श.	12	२२
र.	13	२३
सो.	14	२४
मं.	15	२५
बु.	16	२६
गु.	17	२७
शु.	18	२८
श.	19	२९
र.	20	३०
सो.	21	मा. १
मं.	22	२
बु.	23	३
गु.	24	४
शु.	25	५
श.	26	६
र.	27	७
सो.	28	८
मं.	29	९
बु.	30	१०
गु.	31	११

पत्त्यामध्ये वर्गणीचा कालावधी 13-4/**Jan. 13** असल्यास तुमची वर्गणी संपली आहे, ती त्वरीत भरावी. पत्त्यामध्ये चुका असल्यास तातडीने कळवा.

संपर्क पत्ता :
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९

या अंकाची किंमत : ₹ १५/-
वार्षिक वर्गणी : ₹ १८०/-

प्रकाशन दिनांक :
सौर ११ पौष, शके १९३४
१ जानेवारी २०१३

www.chhatraprabodhan.org
ई-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

प्रिय पोस्टमन,

हा अंक तुम्ही आमच्या लाड या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति -